॥ ७४६५ ॥ पुढें साहावे प्रसंगीं । सांगणें आहेच योगी ॥ यया लागीं तो सारंगी । देश येथें जाणवी ॥ १ ॥ आस्था लागावी अर्जुना । ऐसी मनाची वासना ॥ म्हणोनि सांख्य तें सज्जना । यथाशक्ति सांगतु ॥ २ ॥ बाहेर बाह्य विषया । वीतरागें दापुनियां ॥ दृष्टि देऊनि भोंवया । मध्यभागीं अवकाशीं ॥ ३ ॥ घ्राणीं वाहे निजप्राणु । तेविंच मेळवी अपानु ॥ तुका वदे देतो मानु । लोकामध्यें योगीया ॥ ४ ॥

॥ ७४६६ ॥ बुद्धींद्रियें ही आकारा । मनधरणें साधन वारा ॥ मुनि-मोक्षाच्या मंदिरा । एकसरां चालिलें ॥ १ ॥ चाड न धरी सिद्धीची । तेविंच कामना मोक्षाची ॥ झाला मुक्त सव्यसाची । पुनःपुना किति सांगूं ॥ २ ॥ पैं गा जन्माचें सार्थक । मातें भासे हेंच एक ॥ जाणुनि तुकयाचा विवेक । पदरीं घेती ज्ञातये ॥ ३ ॥

॥ ७४६७ ॥ भोक्ता यज्ञ तपांचा मी । आहे ऐश्वर्य भूमी ॥ सर्व लोकीं महेश मी । सखा तेवीं सर्वांचा ॥ १ ॥ ऐसा प्रभूचा अन्वय । झाला तेथें अहंक्षय ॥ मग शांती वधुप्राय । तो पावतो निर्मळ ॥ २ ॥ तुका विनवी वारंवार । माझ्या मतीं हर्ष फार ॥ संतीं न करावा अव्हेर । प्राकृत भाषा ह्मणोनि ॥ ३ ॥

---

## अध्याय साहवा.

---

॥ ७४६८ ॥ पांडवासि विस्मय । देव वदतां योगीराय ॥ आपणा ठावका अन्वय । असावा हें वाटलें ॥ १ ॥ मग पुसावें हा हेत । कां कीं जेथें हरिप्रीत ॥ तेंच आपुलें ही हित । हें तों कधीं टळेना ॥ २ ॥ ऐसा भाव अंतरींचा । जाणुनि सखा वदे वाचा ॥ ऐके पार्था संशयाचा । मूळ ठावो फिटेल ॥ ३ ॥ आह्मी अंतरीं ठेविजे । मग तें कोणासी अर्पिजे ॥ ऐसें न भेटेल दूजें । पैं मायेचें आवडतें ॥ ४ ॥ अनन्यासी वंची जो कां । होय अधिकारी पातका ॥ असो काळजी सूटका । आजि झालें हें भाग्य ॥ ५ ॥ दाना योग्य तूं सत्पात्र । जैसें कन्येजोगें गोत्र ॥ अथवा परमार्थी श्रोत्र । जैसा दीजे विरक्तीं ॥ ६ ॥ तरी ऐके विचक्षणा । गुज बेई अंतःकरणां ॥ अनश्रुत हे वासना । कर्मफळीं ज्या नाहीं ॥ ७ ॥ करावें तें करीतो । तोच

योगी संन्यासी तो ॥ न निरग्निही जो होतो । अक्रिय तो नाहीं ॥ ८ ॥ तुका वदे विचक्षणीं । मांदुस गीता रत्नखाणी ॥ घ्यावें एकेक निवडुनी । वचनें शेषशायीचीं ॥ ९ ॥

॥ ७४६९ ॥ ह्मणावा जो संन्यास तो । कर्मयोग सिद्ध होतो ॥ दोहीं मार्गें जैसा जातो । एका क्षेत्रा वंदाया ॥ १ ॥ कीं या काम्याचे त्यागें । जो संन्यास घे तूं अंगें ॥ कर्मयोगाही प्रसंगें । नव्हे कांहीं दुसरा ॥ २ ॥ तुका विनवी भावार्थी । लोक परिसो परमार्थी ॥ ज्यास प्रीत योगपंथीं । अहर्निशीं अखंड ॥ ३ ॥

॥ ७४७० ॥ योगारूढ जो कां ज्ञाता । जगीं व्हावया मान्यता ॥ संपादित आमुची वार्त्ता । पैं गा जीवीं धरूनी ॥ १ ॥ कर्म त्यास ही पांडवा । कारण होय या गौरवा ॥ जैसें तेलबळें दिवा । प्रभा दावी अनंत ॥ २ ॥ तया योगारूढा लागीं । ध्यानस्थित कारणअंगीं ॥ पुढें उजळी हेमांगीं । तुकया कारागीर तो ॥ ३ ॥

॥ ७४७१ ॥ जेव्हां न विषयीं कदा । गुंते दैवीक संपदा ॥ तुज सांगतों प्रमदा । लाघव जैसें शुकासी ॥ १ ॥ कर्मीं ही न रुते मन । जैसें श्रीपादा स्वप्न ॥ झाला गज वाजी वाहन । जागा होतां तें मिथ्या ॥ २ ॥ टाकी भोगाचे संकल्प । गेला जीवींचा विकल्प ॥ तेव्हां आरूढ ज्ञानदीप । बोलतो तुकया ऐसें ॥ ३ ॥

॥ ७४७२ ॥ अरे विषयडोहांत । जें कां बुडालें संतत ॥ तें तंव उद्धरावें चित्त । आत्मबळें अभ्यासें ॥ १ ॥ नये बुडवूं प्रपंचीं । पुढें जाणिव गेल्याची ॥ कोण पुसे धनवंताची । लाज जाय धन गेल्या ॥ २ ॥ मित्र हें आपुलें चित्त । साह्य झाल्या फळ देत ॥ शत्रु ही हेंच होत । हा उद्धरूनि अनर्थ ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्वाधिक । साधन हें चि गमे एक ॥ चित्त झाल्या सन्मुख । काय उणें लाभासी ॥ ४ ॥

॥ ७४७३ ॥ मित्र चित्त तें ह्मणावें । जें कां स्वरूपीं विसावें ॥ विश्वरूप अनुभवें । जिंकि स्वात्ममतीनें ॥ १ ॥ हें कां अलभ्य साधन । विधि इंद्र चंद्रेशा न ॥ मानवतीं ऐसा मान । पैं भोगी तें निवाडे ॥ २ ॥ नाहीं तरी अज्ञानांत । मिथ्या भवसिंधु दावीत ॥ तुका ह्मणे जीव भ्रांत । होय शुद्ध हें झाल्या ॥ ३ ॥

॥ ७४७४ ॥ अरे शांताचे कुरुपती । जित चित्ताची आयती ॥ थोरपण हे निगुतीं । चित्त थोरे स्वरूपीं ॥ १ ॥ साचें चिन्हेंची वीरा । मान अपमान वारा ॥ झगटल्या या शरीरा । मेरु ऐसी धैर्यता ॥ २ ॥ तैसेंच शीत उष्ण । विषामृता जैसा कृष्ण ॥ सुख दुःखीं तो सहिष्ण । तुकया चकों नेदीजे ॥ ३ ॥

॥ ७४७५ ॥ ज्ञान भोज्य गुरु हातें । धाला जेवूनी तृप्तीतें ॥ सुखें उद्गार अवाचितें । पैं गा दे तूं सर्वदा ॥ १ ॥ जितेंद्रिय ब्रह्मचारी । राहे कूटस्थ व्यापारीं ॥ भासे न भासे अंतरीं । ज्याचा अंत अढळेना ॥ २ ॥ तोच योगारूढ हेम । मेंडा धोंडा जया सम ॥ तुका ह्मणे सर्वोत्तम । हे रोकडी प्रतीती ॥ ३ ॥

॥ ७४७६ ॥ कोणी कापिलीया मान । दुःखें न पवे रुदन ॥ मित्र जोडे राज शुन ॥ गजवाहनीं मीरवी ॥ १ ॥ दोन्ही सारिखे जयासी । तैसें चित्त सख्यापासी ॥ घेत निस विसांव्यासी । असखा ही तेवींच ॥ २ ॥ साधु बोधा मिथ्या बोली । सम बुद्धी पूजा केली ॥ तुका ह्मणे ज्ञानवल्ली । त्याची झाली सुफळ ॥ ३ ॥

॥ ७४७७ ॥ ॥ कर्मयोगीं चित्त योजी सदोदित । जैसा योगी घेत दिव्यरसु ॥ १ ॥ एकांत सेवन आवडतें मन । पथ्यानें लोटून शाहाणा वागे ॥ २ ॥ स्थिर चित्तें चिंती एक जगत्पती । सद्विद्या सत्प्रीती अनुरागें ॥ ३ ॥ टाकी आशा तैसा परिग्रह वीरेशा । नाहीं जीवद्दशा तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७४७८ ॥ स्थापूनियां शुद्ध देशीं ये प्रसिद्ध । प्रयाग अंबुद्ध संतग्राम ॥ १ ॥ स्थिर हें आपुलें आसन जेणें केलें । बहु उचललें ऐसें नको ॥ २ ॥ नीच तरी भूमी दोष लागे ऊर्मी । कुश मृगचर्मी पट दिव्य ॥ ३ ॥ तेथें सुमुहूर्तें बैसावें निरुतें । आठवी गुरूतें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७४७९ ॥ करुनी मानस एकाग्र हव्यास । नेदी बाह्य पैस मनाधेवों ॥ १ ॥ स्थिर चित्त होय इंद्रियास क्रिया । वोळंगती पायां सदोदीत ॥ २ ॥ चित्त शुद्ध्यर्थांचा योग पैं हटाचा । जयो आसनाचा तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७४८० ॥ माज पाठ शीर ग्रीवा नीट स्थीर ॥ धरूनी निर्धार स्थिर कीजे ॥ १ ॥ उठतां उपाधि तैशा देहीं आधी । गिळीजे अंबुधि नदा जैसा ॥ २ ॥ आवरोनी मना धरी जो धारणा ॥ तुका ह्मणे जाणा योगियातो ॥ ३ ॥

॥ ७४८१ ॥ असे सर्वकाळ चित्तासि निखळ । योजुनी प्रबळ निर्भय जो ॥ १ ॥ शांत मती करणें जीती अंतःकरणें ॥ व्रत निर्मळपणें आचरे हें ॥ २ ॥ चित्तासी मद्रूपीं लावुनि निक्षेपी ॥ वसे स्वस्वरूपीं मत्पर जो ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें सिद्धी स्व सामर्थ्यें । येतां योगीनाथें न पाहणें ॥ ४ ॥

॥ ७४८२ ॥ एवं चित्त ऐसें योजुनी विन्यासें ॥ मन हातीं तैसें आकळावें ॥ १ ॥ मोक्षा अधिकारी होय निर्विकारी । शांतिदेवी वरी श्रीकृष्णाची ॥ २ ॥ तुका ह्मणे येथें संशयी अनाथ । पडती त्यां पंथ लावी देव ॥ ३ ॥

॥ ७४८३ ॥ नव्हे योग ऐसा खावें बहु तैसा । लंघनें भरंवसा जाय सारा ॥ १ ॥ बहू झोंप घेणें योगाचीं लक्षणें । नव्हति किं जागणें चिर जेथें ॥ २ ॥ अर्जुना तूं जाण योगाचें प्रमाण । अंतरींची खूण आह्मीं सांगों ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवो कृपाळु पाहावो । योगाचा बोलावो आतुवडी ॥ ४ ॥

॥ ७४८४ ॥ युक्तीनें वागीजे शीण न आणीजे । आहार घेईजे स्वल्पु तैसा ॥ चेष्टा कर्म सूत्रें युक्तीचीं पवित्रें । जाणीजे स्वतंत्रें जाणतेनी ॥ २ ॥ निद्रा किंवा जागा येथें महाभागा । युक्ति शुद्ध गंगा पाहिजे गा ॥३॥ तयासी हा दुःख नासोनी दे सुख । तो योगु पैं चोख तुकया लाभे ॥ ४ ॥

॥ ७४८५ ॥ आत्मरूपीं चित्त रमे सदोदित । निस्पृह संतृप्त कृपाघन ॥ १ ॥ काम होय शून्य गति ते अनन्य । पाहतां अमान्य न हों आह्मी ॥ २ ॥ सिद्ध ऐसें त्यातें ह्मणावें सर्वार्थें । ऐसें रमानाथें वर्णीयेलें ॥ ३ ॥ ध्यान कैसें कीजे तें श्रोत्रीं घेईजे । तुका ह्मणे माझें हीत ऐका ॥ ४ ॥

॥ ७४८६ ॥ निर्वात सदनीं दीप उपमेनी । चंचळ आसनीं होऊं नये ॥ १ ॥ योगियाचें चित्त मिळे ऐका मात । मजला हे मात एकविध ॥ २ ॥ किंवा पतिव्रता आलिंगीत कांता । वियोगाची वार्ता सहज राहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे घन वृष्टि धरासन । तैसे योगीं मन स्थिरावलें ॥ ४ ॥

॥ ७४८७ ॥ जेथें उपरमे चित्त योगप्रेमें । सहज देहधर्में सांडवला ॥ १ ॥ योगाचिया पंथें निरोधी सर्वार्थ । उसंत पैं जेथें विरामलें ॥ २ ॥ जेथें आत्मा मीळे चित्तानंद मेळें । अखंडित खेळें निरामयीं

॥ ३ ॥ पाहातो षट्पद जेवीं अरविंद । तुका म्हणे नाद सुर ठायीं ॥ ४ ॥

॥ ७४८८ ॥ नसे अंत त्यास अनंत म्हणावें । सुखानें मिळावें ऐसें ठायीं ॥ १ ॥ बुद्धि दृढ धरी तैसीच इंद्रियें । दमी योगराय योग्यांचा तो ॥ २ ॥ जाणे त्यातें मग तो हा करितां कर्म । वृत्तीस जो धर्म चलों नेदी ॥ ३ ॥ पाउलें पांथिक जैसीं उपेक्षीना । तुका म्हणे मना धरूनी वागे ॥ ४ ॥

॥ ७४८९ ॥ न मानीं तो लाभ आणखी त्याहूनी । जीवा समाधानी अखंडित ॥ १ ॥ ज्या सुखाची गती हातास आलीया । मग कष्ट झालिया ने घे जीवीं ॥ २ ॥ आधि व्याधि रोग राज क्षोभ झाला । तुका म्हणे त्याला आठवेना ॥ ३ ॥

॥ ७४९० ॥ दुःख संयोगाची धुळी आंगा न लगे । नभ जैसें उवगे वज्रघायें ॥ १ ॥ बुद्धि योगीं कैसी पाण्यांत मासोळी । मग तळमळी पाथीं कोण ॥ २ ॥ चित्त आत्मरूपीं राहे सर्व काळ । ऐसें यत्नबळ स्वीकारीं तूं ॥ ३ ॥ निश्चय सदृढ ऐसा च साधावा । तुका ह्मणे दावा यम न करि ॥ ४ ॥

॥ ७४९१ ॥ संकल्प करितां कामातें त्यागूनी । शुचि अनुष्ठानीं सर्व त्यागें ॥ १ ॥ मनस्वी खेळतो विषयद्वारीं खळ । कर्ण ग्राम बळ भंजी छंदें ॥ २ ॥ सर्वां ठायीं दंड मना हातीं दिला । कीं लांवा बैसला रामजपीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोष्टी फुकट न साधे । विरळा कोटिमध्यें योगीरावो ॥ ४ ॥

॥ ७४९२ ॥ धारणा युक्ति गुरुमुखें साधी । सहज समाधी प्राप्त होय ॥ १ ॥ नव्हे गाढ मूढ लोक रंजवणें । तटस्थता येणें देहावरी ॥ २ ॥ ताटस्थ्यते नाम समाधी बोलती । उघड फजीती जनामध्यें ॥ ३ ॥ येथें स्वरूपांत प्रवेश हळु हळु । स्थिर मन मेळु चिन्मात्रीं च ॥ ४ ॥ कांहीं न चिंतावें मग पेंठा झाल्या । तुका ह्मणे आल्या तिन्ही लोक ॥ ५ ॥

॥ ७४९३ ॥ ज्या ज्या पैं पदार्थी चित्ताचें चळण । निघे तेथें ज्ञान शुद्ध ठेवी ॥ १ ॥ मन हें अस्थिर चंचळ पांडवा । याचा नित्य दावा परमार्थी ॥ २ ॥ म्हणोनि जें पाहे तेथें आत्मा लावी । वशत्वें वळवी मनोवृत्ती ॥ ३ ॥ त्यांतची असतां विसरलें पुरे । करावें जागें रे तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७४९४ ॥ ऐसे या चित्तातें प्रशांत दशेला । योग्य भासे मला सुख पार्था ॥ १ ॥ साधे रज तमा अतीत ब्रह्मता । रूप अकर्मता तुका ह्मणे ॥ २ ॥

॥ ७४९५ ॥ चित्त सदा योजी जैसा कामी वधू । किंवा लक्ष व्याधु धरी वनीं ॥ १ ॥ योगी तो पांडवा दुजी न वासना । मायेवीण तान्हा सुखा नेणे ॥ २ ॥ ब्रह्म स्पर्शें निवे सायासें वेंचला । अत्यंत सुखाला भोक्ता तोची ॥ ३ ॥ इतर तीं सोंगें नव्हे संपादणी । तुका ते काहाणी ऐकेचिना ॥ ४ ॥

॥ ७४९६ ॥ सर्व भूतांमध्यें आत्मा असे एक । भूतें सकळिक आत्मयांत ॥ १ ॥ नित्य योगी चित्त ऐसा ठेवी जरी । सर्व नेत्रद्वारीं समदर्शी ॥ २ ॥ योग नव्हे तरी ऐसा मार्ग चाले । येणे योगें फोल नव्हे साधु ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृष्ण एक नवल सांगे । तो श्लोक प्रसंगें ऐकीजे हो ॥ ४ ॥

॥ ७४९७ ॥ मातें सर्वत्रांत जो पाहे अर्जुना । जगाची भावना न दिसे जया ॥ १ ॥ मज आंत विश्व घेतुं हा अन्वयो । व्यतिरेकें सेव्यो योगची तो ॥ २ ॥ सोडी ना मी मग त्याचा त्यास झाल्या । सृष्टि प्रळय गेल्या रसातळीं ॥ ३ ॥ तो हि मज मग सोडीना सहसा । तुका ह्मणे कैसा लाभची हा ॥ ४ ॥

॥ ७४९८ ॥ सर्व भूतस्था त्या मातें जाणोनियां । भजे एकत्वीं त्या भाव धरी ॥ १ ॥ मजमध्यें चि तो योगीया जाणपा । तेज गर्भीं आपा वस्ती जैशी ॥ २ ॥ जरी तो प्रपंचीं सर्वथा गुंतला । तरी मुक्तत्वाला काय वाणूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ब्रह्मलोकींचे रहिवासी । आले या धरेशी साकारत्वें ॥ ४ ॥

॥ ७४९९ ॥ समदृष्टी सर्व भूतें । जो का पाहे मद्रूपातें ॥ १ ॥ मजसमान जाणिजे । योगी अर्जुना वंदिजे ॥ २ देहीं सुख दुःख लागे । त्याचा निखर न पावेगे ॥ ३ ॥ देव ह्मणे माझ्या बोलें । श्रेष्ठ तुकया कळलें ॥ ४ ॥

॥७५००॥ करांजळी जोडोनियां । अर्जुन पुसे कृष्णराया ॥ १ ॥ आतां योग बोलिलासी । साम्यें श्लोक चतुष्टयासी ॥ २ ॥ स्थिर मी याच्या स्थिती । न देखें हे कोण गती ॥ ३ ॥ सांग मातें मधुसूदना । तुका ह्मणे जगजीवना ॥ ४ ॥

॥ ७५०१ ॥ मन हेंची कृष्णदेवा । चंचळ वागवी स्वभावा ॥ १ ॥ इंद्रियांत बलोत्तर । ब्रह्महरां अगोचर ॥ २ ॥ याचा निग्रह वायूची । मोट बांधु शक्ती केंची ॥ ३ ॥ तुका येतो काकुलती । येवढी वारावी फजिती ॥ ४ ॥

॥ ७५०२ ॥ हास्य मुखें दैत्यध्वंस । वदे खरेंच प्रश्नास ॥ १ ॥ तुवां केलें धनुर्धरा । महावाहो पार्थ वीरा ॥ २ ॥ मन चंचळ दुर्जय । आहे मजला प्रत्यय ॥ ३ ॥ तरी अभ्यास वैराग्यें । मन वळिजे संतसंगें ॥ ४ ॥ जिंकिजेल जेव्हां मन । तुका तेव्हां समाधान ॥ ५ ॥

॥ ७५०३ ॥ हेंचि बुद्धि कीरे । योग नोहे साकारे ॥ १ ॥ मन नाटोपे जंववरी । योगसिद्धि न त्यावरी ॥ २ ॥ ह्मणोनि प्रयत्नशीळानें । वश्य कीजे या साधनें ॥ ३ ॥ यत्नशीळा पूढें किती । मग या दुर्मनाची ख्याती ॥ ४ ॥ वृथा भय इंद्रियांचें । तुकया बाळा बागुलाचें ॥ ५ ॥

॥ ७५०४ ॥ अर्जुन पुन्हा विनवीतो । एक ऐके हा शब्द तो ॥ १ ॥ निष्ठा असोनि अळसें । नाहीं केला पूर्णाभ्यास ॥ २ ॥ पुढें साधनीं बैसतां । गेलें आयुष्य अनंता ॥ ३ ॥ चळे मन दोहीं पक्षीं । ना तो प्रपंच कमळाक्षी ॥ ४ ॥

॥ ७५०५ ॥ तो काय उभय भ्रष्ट । मेघ थिगळ पैं नष्ट ॥ १ ॥ अपकें मोह पात्रे । ब्रह्म मार्गीं न त्या पावे ॥ २ ॥ महा भुज देव राजा । मतें आमुचें या काजा ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंच भय । वाटे साधका निश्चय ॥ ४ ॥

॥ ७५०६ ॥ निःशेष या संशयासी । उरों नेदी हे विवसी ॥ १ ॥ तूं एक छेदिशी श्रीकृष्णा । आहे भरंवसा सहिष्ण ॥ २ ॥ संहर्ता या संशयाचा । ऐसा प्रताप कोणाचा ॥ ३ ॥ गुरु न दिसे तुजवीण । तुका वाहे आपुली आण ॥ ४ ॥

॥ ७५०७ ॥ हर्षें बोले भगवान । वायां न जाय साधन ॥ १ ॥ येथें अथवा स्वर्गात । बाधा त्यासि अपीडित ॥ २ ॥ मार्ग कल्याणदायक । कोणी दीन नव्हे लोक ॥ ३ ॥ बापा न जाय दुर्गती । तुका ह्मणे याचि गती ॥ ४ ॥

॥ ७५०८ ॥ पुण्यलोकातें पावोनी । राहे अमृत सेवुनी ॥ १ ॥ हर्षें भोग कल्पवरी । त्याची सत्ता सुरांवरी ॥ २ ॥ मग इच्छू फिरलिया । पावे मृत्युलोकीं येया ॥ ३ ॥ शुचि श्रीमंत घरांत । योगभ्रष्ट तुका सुत ॥ ४ ॥

॥ ७५०९ ॥ किंवा योगियांचे पोटीं । योगभ्रष्ट पावे हटी ॥ १ ॥ अथवा भले कुळीं लोक । तेथें होय प्रकाशक ॥ २ ॥ जन्म दुर्लभ ईशाना । ऐसा लोभ त्या सज्जना ॥ ३ ॥ माता पिताउभय पक्षीं । तुका वदे देव साक्षी ॥ ४ ॥

॥ ७५१० ॥ या देहीं पूर्वाभ्यासा । निज मानसा पावेल ॥ १ ॥ पावे बुद्धिचा संयोग । पुन्हा योग आरंभी ॥ २ ॥ मग मोक्ष बहु यत्नें । वेंचि रत्नें मतीचीं ॥ ३ ॥ कुरुनंदना सायास । तुका बहुस स्वीकारी ॥ ४ ॥

॥ ७५११ ॥ अभ्यास तो त्याला पूर्व । बाळ सर्व पावतो ॥ १ ॥ बाळ योजी चित्त जोडे । भ्रांती उडे मायिक ॥ २ ॥ जिज्ञासु वेदागमा । शब्द ब्रह्म मिळाला ॥ ३ ॥ न पडे धन दार पाळवीं । तुका याचवी लागल्या ॥ ४ ॥

॥ ७५१२ ॥ योग साधितां प्रयत्नें । अलभ्य रत्नें हातिये ॥ १ ॥ जया वासना पातकी । काया निकीं प्रक्षाळी ॥ २ ॥ अनेक जन्में क्रियमाणा । मुक्ति राणा वरी तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित दिसे । तरि अनयासें ऐकावें ॥ ४ ॥

॥ ७५१३ ॥ तपियांहुनी थोर । योगीश्वर वंदिजे ॥ १ ॥ माझ्या मतें ह्मणे हरी । ज्ञान्याशिरीं हा दिसे ॥ २ ॥ कर्म योग्याहुनी श्रेष्ठ । हो तन्निष्ठ तस्मात्तूं ॥ ३ ॥ योगी होय तूं अर्जुना । मागे दान तुकया ॥ ४ ॥

॥ ७५१४ ॥ स्वरूपीं निष्ठचित्तें जो कां । लोक लोका माझारी ॥ १ ॥ या सर्व योगियांत । मज मानत तो सांगूं ॥ २ ॥ भक्तियोगें मातें भजे । जो विराजे प्रेमळ ॥ ३ ॥ योगी थोर वंदावा तो । तुका देतो अभय ॥ ४ ॥

## अध्याय सातवा.

॥ ७५१५ ॥ द्वारकानाथ बोले । पार्था ऐकिलें पाहिजे ॥ १ ॥ सप्रेम मन मद्रूपीं । जो निक्षेपीं भावाळु ॥ २ ॥ मदाश्रित योगाभ्यासी । अहर्निशीं अखंड ॥ ३ ॥ सर्वज्ञत्वें जाण मातें । स्फुट ऐकतो तुकया ॥ ४ ॥

॥ ७५१६ ॥ विज्ञानेंसी तुतें ज्ञान । मी संपूर्ण सांगतों ॥ १ ॥ जें जाणोनि पुन्हा येथें । जाणणें तें नुरेची ॥ २ ॥ ऐसी नवलीक बोली । तुका चाली निवेदी ॥ ३ ॥

॥ ७५१७ ॥ मनुष्यांच्या सहस्रांत । नर कचित प्रयत्नीं ॥ १ ॥
ाही मोक्षयत्नीं जाण । जाणे खुण तत्वाची ॥ २ ॥ तो विरळा मज वाटे ॥
तुकया भेटे सोयरे ॥ ३ ॥

॥ ७५१८ ॥ पंचभूतें बुद्धी मन । अहं आठवा लागून ॥ वागत्रीत व-
स्पंदन । कर्म ज्यास सारथी ॥ १ ॥ ते वोढिल तिकडेची । चाली पडली
थाची ॥ यास्तव मीपण भोगाची । ते वाजट क्षणीक ॥ २ ॥ अष्टधा प्र-
ृती भेदलीसे । माझी मजची सायासें ॥ झाली उत्पन्न कैसें । चराचर
ावें हें ॥ ३ ॥ तुका ह्मणे केली देवें । तीस कवणें वारावें ॥ वारिलीया
ाभ पावे । किंवा हानी उदंड ॥ ४ ॥

॥ ७५१९ ॥ येथें अपर कारण । करूं पाहे जो आपण ॥ मूळ प्रकृति
ंपूर्ण । महाज्ञानी बोलती ॥ १ ॥ परावाचा परामाया । बुझे मानसीं सख-
ा ॥ परात्पर आपणीया । पैं ह्मणती तो सुजाण ॥ २ ॥ आतां जीव जे
चेदंश । झाले जयाच्या उद्देश ॥ जाणिजे हें जगदीश । तुका ह्मणे
ोलिला ॥ ३ ॥

॥ ७५२० ॥ ईपासोनी होती भूतें । मूळ चिच्छक्ती जाणते ॥ बहु
ाणती जाणते । गोष्टी नसे झांकिली ॥ १ ॥ आतां उत्पत्ती कीं लय ।
थान निर्मळ मी होय ॥ आहे सर्वांचा प्रत्यय । तुज असे बहु मुखें ॥ २ ॥
ी गा तैसाची जाणीजे । वेदादिका आक्षेपिजे तुका ह्मणे हें घेईजे । निज
दरीं अर्थासी ॥ ३ ॥

॥ ७५२१ ॥ धनंजय या धरेचा । घे तूं धनंजय नामाचा ॥ ह्मसी
ाणे यादवाचा । राजा आपण होय जो ॥ १ ॥ नसे कांहीं मजहूनी । पैं-
ीकडे पाकशासनी ॥ मज माझारी होउनी । हे ठेविलें ईश्वरें ॥ २ ॥ सूत्रीं
णी एक हेम । अळंकाराचें द्विनाम ॥ पाणी कल्लोळ हें सम । तुका वर्म
िवेदी ॥ ३ ॥

॥ ७५२२ ॥ या पृथ्वीचा पुण्य गंधु । तो मी ह्मणे दीनबंधु ॥ जळीं
विभूती प्रसिद्ध । रस मीच कौंतेया ॥ १ ॥ तेंवीं चंद्र आणि सूर्यांत ॥ आहे
ाझी प्रभा दीस ॥ प्रणव शब्द मी वेदांत ॥ उघड घेई अनुभवें ॥ २ ॥ नभीं
िषय शब्दाचा । तो मी कैवारी दासाचा ॥ नरीं अर्थ पुरुषार्थाचा । वीर्य
ान मीच गा ॥ ३ ॥ ऐसा माझा प्रादुर्भावो । पुढें; सांगुं अनुभवो ॥ पुण्य
ध पृथ्वीचा हो । भूलवणी ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७५२३ ॥ आतां पंच पावकांत । आहे ज्योत्स्ना मीच जोत ॥ जीवन जें प्राणियांत । पै गा मीच नांदतों ॥ १ ॥ तपतापशामाझारीं । आहें म्हणतु कंसारी ॥ तरी धाक चराचरीं । पैं लागतो तयांचा ॥ २ ॥ नाहीं शस्त्र अस्त्र सेना । नाहीं मेळविलें धना ॥ तरी धाक तपोधना । दे मुनि इंद्रा विधीसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम ज्याचें । ऐकिल्या यम काळाचें ॥ हृदय फुटे मग जीवाचें । काय सांगूं माहात्म्य ॥ ४ ॥

॥ ७५२४ ॥ सर्व भूतांमध्यें बीज । तो मी ह्मणे लक्ष्मी नीज ॥ विधी पुरातन अज । पार्था प्रगटी तुज पुढें ॥ १ ॥ भूतें मिथ्या मृगजळ । मी दिनकर सर्वकाळ ॥ नव्हे ऐश्वर्य विकळ । रति मात्र फाल्गुन ॥ २ ॥ असे तद्बीज नित्य मी । बुद्धिमंतांत बुद्धि मी ॥ तेज तेजस्वीयांत मी तुका ह्मणे हरि वदे ॥ ३ ॥

॥ ७५२५ ॥ बळवंतांमाजी बळ । तो मी बोलें मेघनीळ ॥ कामरागहीन चळ । नातुडे तें नित्य मी ॥ १ ॥ विरुद्ध न धर्मासी । काम तो मी गुणराशी ॥ याचिलागीं पुण्यराशी । पैं वेंचती असंख्य ॥ २ ॥ अरे पार्था धनुर्धरा । चराचराचा पसारा ॥ वागवीतों सदयोदरा । तुका ह्मणे अनुभवें ॥ ३ ॥

॥ ७५२६ ॥ आतां सत्वगुणी शुद्ध । रजोगुणी तो विरुद्ध ॥ तम केवळ निषिद्ध । भाव असे तयाचे ॥ १ ॥ आहे माझी सूत्रदोरी । तरी अक्षय तोरी ॥ साची आहे दानवारी । अप्रसिद्धांत आणवी ॥ २ ॥ ते मिथ्या सर्वदोर । रूपें आहे निर्विकार ॥ कीं मी रज्जु नसे थार । मज रज्जुंत सर्प ते ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य गोष्ठी । आली अनुभवा सृष्टी ॥ देव जाणे हें अदृष्टी । माया मोहें नेणती ॥ ४ ॥

॥ ७५२७ ॥ अरे त्रिगुण भावांत । विश्व मोहलें संतत ॥ मातें नेणोनियां मात । मायेचीच ऐकती ॥ १ ॥ नेणें जो मी आत्मादोरू । गुणसर्पा पैल थोरू ॥ झाकी उघडी बाजारू । तैसें नव्हे गारुड ॥ २ ॥ उघडें येतें अनुभवा । बाल्य तारुण्य प्रभावा ॥ वृद्धपणीं ही विसांवा । तुका ह्मणे विसरले ॥ ३ ॥

॥ ७५२८ ॥ मी देव माझी हे त्रिगुण वेणी हे । नंदिनी संदेहे असंख्य ॥ १ ॥ न तरवे कांहीं उपावची नाहीं । मातें भजे तो ही तरू श-

के ॥ २ ॥ माझीया नामाची सांगड फुकाची । मग या मायेची सत्ता राहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मातें बोलिला अनंत । उतरले संत संख्या नसे ॥ ४ ॥

॥ ७५२९ ॥ मातें न भजती पापी जे कुमती । पुढें मूर्खोत्पत्ती झाली ज्यांची ॥ १ ॥ अधम ते प्राणी भ्रष्ट कुव्यसनी । बुद्धि जे मायेनी हरितली ॥ २ ॥ पावले वैभवा दैत्याच्या कुभावा । कुहरांत दीवा मालवला ॥ ३ ॥ तुका ह्मणे संगी यमाचा निःसंगी । राहती कुसंगी कल्पवरी ॥ ४ ॥

॥ ७५३० ॥ भजती पुण्याचे न येथें फुकाचे । आमुच्या द्वाराचे अधिकारी ॥ १ ॥ चतुर्विध जाणा ऐकावें अर्जुना । ठेवी गोष्टी मना पैलतटीं ॥ २ ॥ आरोग्य कामास दुसरा जिज्ञास । अर्थार्थी परीस आत्मवीद ॥ ३॥ ज्ञानीयांत युक्त सांगेल अच्युत । तुका ह्मणे अंत नाहीं सुखा ॥ ४ ॥

॥ ७५३१ ॥ युक्त ज्ञानी दिसे ज्यांत भक्ति वसे। एकत्वीं विलसे भक्ति ज्याची ॥ १ ॥ तो थोर अर्जुना आवडतो मना । त्या प्रिय भावना आत्मा जैसा ॥ २ ॥ तो ही आत्मा मज प्रिय हेंचि निज । बोले यदुराज तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७५३२ ॥ तोही थोर परी ज्ञानीया शरीरीं । मीच वस्तीधारी मानीताती ॥ १ ॥ मातें सर्वस्वानें ज्याचेनी भजनें । सद्गती ते मनें वरीयेली ॥ २ ॥ भजे युक्त चित्तें प्राचीन संचितें । योजी वंचींना ते काया मसी ॥ ३ ॥ अनुराग येणें घेतु बळ दुणें । सार्थक करणें मानी तुका ॥ ४ ॥

॥ ७५३३ ॥ बहुत जन्मांचिये अंतीं ऐसी सोय । लाभे निधी होय पायाळाच्या ॥ १ ॥ ज्ञानी मातें भजे ऐसाची जाणीजे । तो यज्ञेंचि वरसे कणगर्भी ॥ २ ॥ किंवा वासुदेव दिसे भास सर्व । जेवीं विस्तरे पर्व विधि पुखें ॥ ३ ॥ तो थोर दुर्लभ न अती सुलभ । तुकया अंगीं कोंभ उमटला ॥ ४ ॥

॥ ७५३४ ॥ ज्या ज्या कामीं ज्ञान नेलें सुरसाधन । अंतरा आयन घ्यावें तें हें ॥ १ ॥ त्यास मी प्रिय कीं आत्माच नित्य कीं । तो ही स्वात्मा बाकी काय उरे ॥ २ ॥ मज प्रिय प्रिय नव्हेच अप्रिय । तुका तो सुप्रिय किती वाणूं ॥ ३ ॥

॥ ७५३५ ॥ जो जो जी जी भक्ती तनू पुरातनू । श्रद्धे सनातनू ह्मणे भजों ॥ १ ॥ त्या त्यास अचळा श्रद्धेचा जिव्हाळा । देतो कुंती बाळा त्या त्या रूपें ॥ २ ॥ आमुची आगत्य यतुली सांप्रत । तैसें त्या सर्वत्र माझ्या

ठायीं ॥ ३ ॥ मातेच्या उदरीं वसवी कुमार । प्रीत भारे थार तुका पदीं ॥ ४ ॥

॥ ७५३६ ॥ त्या श्रद्धेनें त्यांस पूजी सावकाश । त्यांत जो अन्यास सेवा धारी ॥ १ ॥ त्यां पासुनि पावे काम सद्भावें । कामातें स्वभावें मीच निर्मी ॥ २ ॥ सारांश जे वृत्ती सारोनी प्रवृत्ती । देतु आत्मप्रीती कृपाळू मी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव नभ भक्तभाव । वायूचा प्रभाव कवळीत ॥ ४ ॥

॥ ७५३७ ॥ अल्प बुद्धी ज्याला फळें प्राप्त त्याला । होती सकळांला अंतवंत ॥ १ ॥ मेले ते तयांस पावती बहुवस । मद्भक्तां निवास माझ्याठायीं ॥ २ ॥ ह्मणुनीयां ज्ञानी असे जो साधनी । तेणें मी निदानीं नये सांडूं ॥ ३ ॥ आपुलें माहात्म्य वर्णी जलद श्याम । तुका ह्मणे प्रेम असो येथें ॥ ४ ॥

॥ ७५३८ ॥ पार्था बा अपुलें वर्णीतों नवलें । भक्तें वश्य केलें भुलवणी ॥ १ ॥ व्यक्त मी मानीतों ऐसेंच कल्पीतों । अव्यक्तास होतो शब्द कैसा ॥ २ ॥ अज्ञानपणानें विसरती मनें । मूढ या भावनें येती केवीं ॥ ३ ॥ प्रत्यक्ष प्रमाण लावीती दूषण । अव्यक्त निर्गुण गूढ कल्पी ॥ ४ ॥ नेणतां हे पर वस्तु अगोचर । अव्यय प्रकार अत्युत्तम ॥ ५ ॥ तुका ह्मणे दया हरिची असलीया । तरीच प्रत्यया गोष्टि येती ॥ ६ ॥

॥ ७५३९ ॥ झांकलों मी असे कोणासी न दिसे । योगमाया भासे मजवरी ॥ १ ॥ सर्वांसी प्रगट न दिसें मी अचाट । मूढ फळकट काय जाणें ॥ २ ॥ जो कां मी अनादी अनंत परवादी । मौन जेथें वेदीं घेतलेंसे ॥ ३ ॥ अगाध मीचही कांहीं जें स्वल्पही । तुका गर्जे ग्वाही मृत्यु लोकीं ॥ ४ ॥

॥ ७५४० ॥ जीं गेलीं तयांस जाणे मी वीरेशा । होतीं त्यांची दशा पाहाताहे ॥ १ ॥ भूतें भविष्यानें होणार जें पुढें । आहे मजकडे जाणीव तें ॥ २ ॥ मातें गा कोणीच नेणती पांडवा । ऐशा नवलावा किती सांगूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आत्मा जाण जैसा देह । देहास संदेह आत्मरूपीं ॥ ४ ॥

॥ ७५४१ ॥ प्रिय इच्छा तैसा अप्रियांत द्वेष । होतसे उत्कर्ष त्रिभुवनीं ॥ १ ॥ द्वंद्व मोह यासी असे मुळबीज । जाणसी सहज बोलों आह्मीं ॥ २ ॥ सर्व भूतें सृष्टि काळीं मोहालागी । पावती प्रसंगीं अनुभवें ॥ ३ ॥ पूर्वील मोह दोरा वोवी जीव मणी । तुका ह्मणे खाणी दुःखाची जे ॥ ४ ॥

॥ ७५४२ ॥ क्रिया चोख ज्यांची तिचीया बळानें । कां पृथ्वी जळानें नीच पाहावी ॥ १ ॥ ज्यांच्या अंतरींचीं गेलीं पुण्यपापें । अंगीं मारे सर्पे चंदनाच्या ॥ २ ॥ मातें जो भजेल सुटेल निश्चयें । त्यासी नाहीं भय दोषांचें या ॥ ३ ॥ दृढव्रत तेची घेणार मोक्षासी । तुका ह्मणे ऐसी गोष्टी झाली ॥ ४ ॥

॥ ७५४३ ॥ नासावया जन्ममरणाचें मूळ । जे कां यत्नशीळ महाश्रय ॥ १ ॥ ते ब्रह्म जाणती काशास्तव जरी । अध्यात्मिक सारी कर्ममार्गु ॥ २ ॥ तेचि गा तरले तारीती आणीका । मार्ग हा आसका विस्तारुनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां शेवटील श्लोक । तो जगन्नायक बोले कैसा ॥ ४ ॥

॥ ७५४४ ॥ अधिभूत अधियज्ञासिरे पार्था । सहित वीरनाथा अधिदैव ॥ १ ॥ मीच होय ऐसा भरंवसा मानुनी । भजती अनुदिनीं प्राणी जे कां ॥ २ ॥ प्रयाणीं ही तेची जाणती पांडवा । तुका ह्मणे जीवा केलें मुक्त ॥ ३ ॥

॥ ७५४५ ॥ ऐसे हे प्रसंग संपले पैं सात । गीता देवी भक्त वरदानी ॥ १ ॥ श्रवणें पठणें करी कार्यसिद्धी । मायिक उपाधी वारूनियां ॥ २ ॥ तुका विनवणी करी साधुजना । श्रवणीं भावना शुद्ध धरा ॥ ३ ॥

---

## अध्याय आठवा.

॥ ७५४६ ॥ पूर्व प्रसंगांत परमहंस योग । निवेदी श्रीरंग आत्मलाभें ॥ १ ॥ परी प्रसंगांतीं ऐकिलें पार्थिवें । अध्यात्म बरवें अधीभूत ॥ २ ॥ गूढ न समजे यास्तव आशंका । घेऊनी आशंका घे तूं झाडा ॥ ३ ॥ ते सप्त प्रश्न एका मागें एक । ऐका सकळीक भावीक हो ॥ ४ ॥ ऐका महाराज राज मुगुटांत । जोडोनीयां हात विनवितों ॥ ५ ॥ देवराया काय ब्रह्म तें सांगावें तैसेंच बोलावें आध्यात्म हीं ॥ ६ ॥ पुरुषोत्तमा कर्म कशास ह्मणावें । अधिभूत बरवें तैसें सांग ॥ ७ ॥ अधिदैवत सा संस्कारुनी बोले । वर्म न कळलें बोले तुका ॥ ८ ॥

॥ ७५४७ ॥ अधियज्ञ कैसा कोणता ह्मणावा । देहीं या जाणावा कैसा आह्मी ॥ १ ॥ जाणावासि कैसा प्राणाच्या प्रयाणीं । प्रसक्ष काहाणी हस्तीं

लाभे ॥ २ ॥ सुज्ञ जे तयांनीं विचारपंथानें । यावें मधुसूदनें बोलावें हे ॥ ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्रश्न सात अर्जुनाचे । हंस सत्याब्धीचे हेलावे हे ॥ ४ ॥

॥ ७५४८ ॥ हांसोनी बोलिला कर्त्ता जो जगाचा । आमुच्या लाभाचा संशयो हा ॥ १ ॥ शुद्धब्रह्म जें तें ह्मणावें अक्षर । अध्यात्म प्रकार भावें बोले ॥ २ ॥ भूतभौतिकांची जे कांहीं उत्पत्ती । सृष्टी करी जे तें कर्म जें कां ॥ ३ ॥ तुका ह्मणे श्रोतीं व्हावें सावधान । करावें चिंतन भगवंताचें ॥ ४ ॥

॥ ७५४९ ॥ अधि भूताक्षर तनू हा विकार । जीवात्मा प्रखर अधिदैव ॥ १ ॥ बिंब त्याच प्रभें प्रतिबिंब न्यायें । अधियज्ञ होये याच देहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे आतां सांगेल अंतर । न धरूनी दूर सज्जनासी ॥ ३ ॥

॥ ७५५० ॥ मातेंच प्रयाणीं जीवीं धरूनियां । देह सोडिलीया नामस्मरणें ॥ १ ॥ जाय प्राण न या मद्रूपावांचूनी । विश्रांती नयनीं आढळेना ॥ २ ॥ संशय कायसा कांकणा आरसा । पाहाणें धारसा लागलीया ॥ ३ ॥ तुका ह्मणे नामें झाला गज मुक्त । प्राणी ते अशक्त उद्धरेची ॥ ४ ॥

॥ ७५५१ ॥ जें जें आणीक ही ध्यान । अंतीं त्द्दयीं धरून ॥ १ ॥ देह सांगिला जयानें । जाय पाहे तो तीं स्थानें ॥ २ ॥ एक रंगलें अंतर । आत्मा तेथें धरी थार ॥ ३ ॥ तुका ह्मणे येह परी । वासनेच्या करीं दोरी ॥ ४ ॥

॥ ७५५२ ॥ तस्मात तूं सर्वदा पार्था । मातें स्मर भाव पंथा ॥ १ ॥ युद्ध निःशंक करावें । मज हृदयीं सांठवावें ॥ २ ॥ बुद्धि आल्या आमुचे ठायीं । मुक्त होसी संशय कायी ॥ ३ ॥ निश्चयें पावसी मातें ॥ तुका शरण अनन्यातें ॥ ४ ॥

॥ ७५५३ ॥ अगा अभ्यासाचा योग । दृढ आसलीया चांग ॥ १ ॥ मग अन्यत्र मार्गीत । पार्था न जाती महंत ॥ २ ॥ मनें ऐसिया कसवटी ॥ दिव्य पुरुषीं घाली मिठी ॥ ३ ॥ पावे सतत चिन्मात्र । तुकीं एक चिंतन मात्र ॥ ४ ॥

॥ ७५५४ ॥ अरे पुराण सर्वज्ञ । प्रदायक फलाभिज्ञ ॥ १ ॥ स्मरेल जो सूक्ष्म दीपा । अतींद्रिय आत्मरूपा ॥ २ ॥ अतर्क्यत्व गुणें रूपीं । धरी विश्व झाला लोपी ॥ ३ ॥ भानु प्रकाशुनी तमीं । तुका अव्यक्तचि व्योमीं ॥ ४ ॥

॥ ७५५५ ॥ प्राण प्रयाणीं या मना । आवरोनि रे अर्जुना ॥ १ ॥ मद्भक्तिच्या योगबळें । करुनी प्राणें एक मेळें ॥ २ ॥ निज भ्रुव चक्र युग । भेदी पावे ज्योतिर्लिंग ॥ ३ ॥ दिव्य पुरुषा अनादी । तुका समर्पिला पदीं ॥ ४ ॥

॥ ७५५६ ॥ जे कां अक्षर बोलती । वेद संत जयाप्रती ॥ १ ॥ यती वीतरागी ज्यांत । निघती धरुनी गुरुहात ॥ २ ॥ अहो इच्छूनीयां जगीं । स्रागें लागेल या मार्गीं ॥ ३ ॥ त्याची प्राप्ती सांगों तुज । तुकया निरोधावें बीज ॥ ४ ॥

॥ ७५५७ ॥ कोंडोनियां नव द्वारें । नेमी जाणे प्रत्याहारें ॥ १ ॥ मन हृदयीं कोंडोनी ॥ प्राण मस्तकीं धरुनी ॥ २ ॥ योग धारणा अनुष्ठी । तुका नोहे कांहीं कष्टी ॥ ३ ॥

॥ ७५५८ ॥ हें एकाक्षर ब्रह्म । वेदशास्त्रांत उत्तम ॥ १ ॥ असा जपे मातें स्मरे । काया वाचा श्रद्धाद्वारें ॥ २ ॥ जाय अर्चिरादि मार्गीं । एकट दुजा न संसर्गीं ॥ ३ ॥ तया ब्रह्मया सह गती ॥ तुका ह्मणे मुक्त होती ॥ ४ ॥

॥ ७५५९ ॥ नव्हे इतरा सारिखा । ऐसा जाणुनीयां सखा ॥ १ ॥ चित्तीं चिंती सदा स्मरे । वत्स धेनुसी हुंबरे ॥ २ ॥ पार्था सुलभ मी झाला । रक्षी अंतर बाह्याला ॥ ३ ॥ नित्य योजिला योगीं जो । तुका ह्मणे त्यासी भजों ॥ ४ ॥

॥ ७५६० ॥ मज पावोनीयां जन्मा । न फिरेच ज्याचा प्रेमा ॥ १ ॥ घर दुःखाचें नश्वर । देह अपवित्रची थोर ॥ २ ॥ न पावती पुन्हा संत । पाहा या चोरांचा संघात ॥ ३ ॥ थोर पावले जे गती । तुका वर्णी पुढत पुढतो ॥ ४ ॥

॥ ७५६१ ॥ अरे अर्जुना पुनरा । वृत्ती नेम चराचरा ॥ १ ॥ विधिलोकादीकींहुनी । उसळती येणीं जाणीं ॥ २ ॥ परी मातें पावलीया । कोण फिरेल कौंतेया ॥ ३ ॥ पुन्हा जन्मा नये तुका । कधीं पाहावया लोका ॥ ४ ॥

॥ ७५६२ ॥ युगें हजार एकें दिवसें । ह्मणती येतसे सहजे ॥ १ ॥ रात्री तैसीच विधिची । जे सृष्टिची बुडवण ॥ २ ॥ गेले जाणती तेथें जे । सुखभोजें भोगाया ॥ ३ ॥ क्रम मुक्त्यर्थ राहिले । तुकीं न आले तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ७५६३ ॥ व्यक्ति प्रकृति पासुनी । तूं सज्ञानी जाणसी ॥ १ ॥ विधि दिनागमीं होती । आपुल्या चित्तीं वोळखे ॥ २ ॥ या तत्वीं प्रकृती लीना । कांहीं वासना न ठेवी ॥ ३ ॥ निशा आरंभितां होती । तुका प्रकृति निवेदी ॥ ४ ॥

॥ ७५६४ ॥ तोचि हा ग्रामभूतां । ब्रह्मसत्ता झाला जो ॥ १ ॥ होतो होऊनी नासतो । मी पाहातों निसानी ॥ २ ॥ लीन अवश हा रात्रीं । तृणपत्रीं बीजेसीं ॥ ३ ॥ पुन्हा दिनारंभीं होतो । व्यापार तो ह्मणे तुका ॥४ ॥

॥ ७५६५ ॥ सत्ता निराकार तया । विकार तया नसे जी ॥ १ ॥ भूतां प्रकृतीहुनी । सृष्टि भुवनीं ना दिसे ॥ २ ॥ निराळी जे सर्वांभूतीं । आहे वस्ती आगम ॥ ३ ॥ विश्व नासतां न नासे । तुका वसे अव्यक्तीं ॥ ४ ॥

॥ ७५६६ ॥ निराकार जें अक्षर । नसे क्षर प्रळयांत ॥ १ ॥ बोलिली ती श्रेष्ठ गती । पुना वृत्ती परिच्छिन्न ॥ २ ॥ न येति तेथें जे गेले । साधन गेले साधुनी ॥ ३ ॥ माझें धाम तेंची तुका । पाडी चीरा चौऱ्यायशीं ॥ ४ ॥

॥ ७५६७ ॥ तो तो अद्वैत भक्तीनें । कीं प्रीतीनें हृदयींच्या ॥ १ ॥ पार्था पाविजे पुरुषें । छंदोत्कर्षे विवेकें ॥ २ ॥ हीं भूतें जया स्वरूपीं । लीन व्यापी लहरी ॥ ३ ॥ ज्याणें व्यापिलें हें जग । निरुद्वेग आसुनी ॥ ४ ॥ तुका म्हणे माहात्म्य अंतीं । रमापती बोलतो ॥ ५ ॥

॥ ७५६८ ॥ ज्या काळीं न पुन्हा जन्म । ऐसें वर्म एक आहे ॥ १ ॥ योगी होतां ही जन्मतो । तो सांगतो अवधारी ॥ २ ॥ देवताही सांगूं क्रमें नेणों प्रेमें वंचुगा ॥ ३ ॥ मार्गीं भेटती भार्वेची । ऐके तेचि म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ७५६९ ॥ पावक ज्योत हृदयांत । हे जागृत असावी ॥ १ ॥ दिनपक्ष शुक्लमास । षट्पूर्णास जे येती ॥ २ ॥ उत्तरायण हा मार्ग । पार्थी स्वर्ग जात्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेदवेत्ते । विधिलोकातें पावती ॥ ४ ॥

॥ ७५७० ॥ धूमो राति कृष्णपक्ष । मास साक्ष तेवींच ॥ १ ॥ दक्षिणायन चंद्रामृत । झाल्या प्राप्त यद्यपी ॥ २ ॥ योगी पूर्ण तरी फीरे । हे कां वीरें चुकेना ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्रसिद्ध हें । मार्गद्वय निर्मिले ॥ ४ ॥

॥ ७५७१ ॥ शुक्ल कृष्ण गती ऐश्या । दोनी सांगितल्या जैश्या ॥ इतर नव्हति गा तैशा । पैं बोळाया आधारु ॥ १ ॥ जेणें पंथ हा पाहाणें । तरो

न भरोसे घेणे ॥ वोळखती पैं शाहाणे । ब-या शाश्वत पार्थिवा ॥ २ ॥ अ-र्चिला पहिला पंथ । बो तरी नव्हेगा अनाथ ॥ कीर्ती ठेवुनी सनाथ । पणें साधु पैं गेले ॥ ३ ॥ ते न येति घेऊं जन्म । दुसरीचें खोटें कर्म ॥ तुका ह्मणे खरें काम । तरी ध्यावें पदरांत ॥ ४ ॥

॥ ७५७२ ॥ जाणोनि माझ्या मतें । मार्ग दोनी हे आइते ॥ वोळ-खीजे बुद्धिवंतें । गती किंवा अवगती ॥ १ ॥ परी हे अज्ञाना प्रसंग । आ-त्मयोगीं तो निःसंग ॥ त्यासी न पडे व्यासंग । ऊर्ध्व अधर्मी ज्ञासाळा ॥ २ ॥ ययालागीं बहुतां परी । आम्ही शिक्षिलें उत्तरीं ॥ अर्जुना तस्मात तरीं । खुण अंतरीं धरुनी ॥ ३ ॥ योग युक्तीनें साधीरे । मग जनन व्या-धीरे ॥ तुज सखया न बाधीरे । तुका वदला निश्चयें ॥ ४ ॥

॥ ७५७३ ॥ वेदामध्यें पाहाताना । तैसें तपही अर्जुना ॥ अथवा वि-धियुक्त हें वना । करितां फळ जें जोडे ॥ १ ॥ दशदानें महादानें । भूमि-कन्या शय्यादानें ॥ सद्यवारक अवदाने । पुण्य जें कां अर्पीती ॥ २ ॥ अ-तिक्रमी जाणुनियां ॥ सर्व मातें आणुनियां ॥ राहे अलिप्त सा वायां । गेला ह्मणेल कोण गा ॥ ३ ॥ नाशवंत सांडी सारे । योगी चढे साक्षात्कारें ॥ तें आद्य परंपर रे । तुका मग्न ज्यामाजी ॥ ४ ॥

॥ ७५७४ ॥ ऐसी अष्टम प्रसंगीं । गति नेमी तूं सारंगी ॥ साधका-स कळे अंगीं । सुख ऐसें भोगाया ॥ १ ॥ आहो योगी श्रेष्ठ सांत । जो कां हरि रूपीं संतत ॥ त्याची वर्णियेली ख्यात । याच अष्टम अध्यायीं ॥ २ ॥ पुढें नवम ऐकावा । ज्यांत देवो सांपडावा ॥ तुका ह्मणे आह्मा बरवा । ज्या वर्णनीं आनंदु ॥ ३ ॥

---

## अध्याय नववा.

---

॥ ७५७५ ॥ पूर्व प्रसंगीं बोलिला । अर्जुनासी देव भला ॥ अक्षरें प्रथ-म निरूपिला । परब्रह्म योग जो ॥ १ ॥ आतां राजविद्या येथें । राज गुह्य तेणें पंथें ॥ ऐकिजेल जी समर्थें । काय कैसें महात्म्य ॥ २ ॥ हें तों गुह्याहु-नी गुह्य । आह्मी तूंतें सांगूं पाहे ॥ तूं सज्जन परिसु लाहे । हे तरी कां पा वंचना ॥ ३ ॥ विज्ञानेंसि तुज ज्ञान । यया ज्ञानें एक साधन ॥ आहे मोक्ष अनुसंधान । तुका ज्यांत उद्धरे ॥ ४ ॥

॥ ७५७६ ॥ विद्या गुह्यांत जो राजा । धर्म उत्तम सहजा ॥ पावन व्हावया सांप्रत जा । नित्य सेवी श्रद्धेनें ॥ १ ॥ नव्हे शाब्दिक हें ज्ञान । कांहीं धरिशी अनुमान ॥ देतों प्रत्यक्ष निवडून । येइल पाहे अनुभवा ॥ २ ॥ नित्य जें सुख सुकाळ । साध्य होतें सर्वहि काळ ॥ तेंच करूं हस्तामळ । तुकयालागीं आवडे ॥ ३ ॥

॥ ७५७७ ॥ होईन मी ब्रह्मज्ञानी । ऐशा छंदाच्या आस्थानीं ॥ पाहती ग्रंथ संमत मुनी । कैसे अनुभव बोलिले ॥ १ ॥ मुनी बोलिले मजसाठीं । नानातर्क हटवटी ॥ तेचि पाहूनि फुंदे होटीं । परि आज्ञा नेणेची ॥ २ ॥ शब्द माझा उपेक्षिला ॥ गीता धर्म उच्छेदिला ॥ तो मज मित्रद्रोही झाला । यमपुराला मी वोपी ॥ ३ ॥ मग तेथें लागे दंड । जन्म नरकाचे उदंड ॥ जन्मलिया मृत्यु भंड । तुका ह्मणे चुकेना ॥ ४ ॥

॥ ७५७८ ॥ हाचि विश्व सर्पदोरें । मी या धारण निर्विकारें ॥ पायीं करा वांचुनि सारे । सूत्र याचें चाळितों ॥ १ ॥ नयनावांचुनी पाहातों । कैसा भ्रांत जीव भीतो ॥ मोक्षालय सांडोनियां तो । वनीं पळतो विषयांच्या ॥ २ ॥ कोणी दडे कोणी पडे । आइत्या हर्षें नाचे उडे ॥ हृदया वांचुनि मन वेडें । माझें होतें हांसतां ॥ ३ ॥ शेवट शब्दाचा सांगतों । भूत भास मज मधीं तो ॥ सत्य सर्पांत मी दोर तो । नसे हाच नवलाहो ॥ ४ ॥ मिथ्या सर्प सत्य झाले । रज्जुसर्प भ्रांतिमुळें ॥ सद्गुरुकृपें निरसलें । तुकया भ्रांति रज्जुत्वें ॥ ५ ॥

॥ ७५७९ ॥ तेही सृष्टि सर्प वीरा । दुर्लभत्वें मी दूर दोरा ॥ वायु मोडी तरुवरा । पृथ्वीसंगें अलिप्त ॥ १ ॥ पाहे युक्ति कैसी मौज ॥ ऐश्वर्य योग सांगूं तुज ॥ येरवीं हें स्वस्वरूप बीज । हातीं येणें अप्राप्त ॥ २ ॥ भूतीं नसोनि अर्जुना । धरितों हेकें कल्पना ॥ किंवा कल्पा बुद्धि नाना । माझी ऐसी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७५८० ॥ नभीं वायु हा दृष्टांत । देतां सत्यभामाकांत ॥ सर्वत्र चिसदोदित । मित्र अथवा रिपु हो ॥ १ ॥ कळे मोठा नभींच तो । अवकाशीं वावरतो ॥ आत्मा यांत त्यापरि तो । तूंच सर्व मानरे ॥ २ ॥ स्मृत अस्मृत प्रमाण । अवघा आत्मा बुझे खूण ॥ येथें जी जी ह्मणोनि चरण । वंदी पार्थ ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ७५८१ ॥ द्रष्टा रज्जुच मी माया। माझी दृष्टी निजालया ॥ तांत लोंन जगकाया। सर्व मीच हे मानी ॥ १ ॥ कल्पादि सृजा। जो मी प्रभू या भूतांजा ॥ जाणें ज्ञान योग माझा। शिव मातें भासतो ॥ २ ॥ ह्मणोनि तो मायातीत। स्वरूपीं रतला संतत ॥ तुका चरणीं शरणागत । कृपा माझी त्यावरी ॥ ३ ॥

॥ ७५८२ ॥ पुनः पुना पार्था। विश्व हें सर्वथा ॥ माया प्रतिपंथा। अधिष्टि तूं ॥ १ ॥ तिची दृष्टी मोहरे। जीवोत्पत्तीद्वारें ॥ माझियाविष्करें। रूपावरी ॥ २ ॥ निर्मितों मीच जाण। स्वात्मबुद्धीचें कारण ॥ दोरि कीं तें स्वप्न। जंबुकाचें ॥ ३ ॥ भूत ग्रामतीळा। स्वयेंच निर्मियेला ॥ बरवा भासला। तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७५८३ ॥ मातें सृष्ट्यादीकें व्याप्तीचीं कटकें। अथवा लटिकें स्वप्नधर्म ॥ १ ॥ न बाधती वीरा धनंजय पुरा। पाहे सारासार धुंडाळुनी ॥ २ ॥ कीं मी उदासीन कैसा तो सांगेन। कर्मासी व्यापून अंतर्बाह्य ॥ ३ ॥ परि ना लंपटु पाहातां खटपटु। चांगलें चोखटु नेणे तुका ॥ ४ ॥

॥ ७५८४ ॥ मी द्रष्टा देखणा सर्व कर्म खुणा। जैसा कां पाहुणा चौ दिसांचा ॥ १ ॥ दृष्टिनें हें माझें चाले सृष्टिबळें। अग्निसंगें कुटिजे लोहो जेवीं ॥ २ ॥ माया चराचर जाणे मी अक्षर। गोंडाळांत नीर वेगळेंची ॥ ३ ॥ या हेतूनें विश्व सर्प महागर्व। होतो अविर्भाव मजदोरीं ॥ ४ ॥ रवी मृगजळ तेणें तरि पुष्कळ। तुका ह्मणे खेळ अचाट हा ॥ ५ ॥

॥ ७५८५ ॥ तो महाईश जगा जगदीश। पर हा महेश नेणें भावा ॥ १ ॥ तेथें मूढमती मातें अवमानीती। कोणाबळें तरती कळेना हें ॥ २ ॥ मानवदेहांत देखोनी कर्मांत। ह्मणती अनंत आह्मा ऐसा ॥ ३ ॥ परंज्योती प्रभू नेणुनी स्वयंभू। नेणतां हा क्षोभू झाला तुकया ॥ ४ ॥

॥ ७५८६ ॥ वृथा आशा स्वर्गवस्ती ज्यां नैसर्ग। पिशाच्या कुळवर्ग लग्नीं जैसा ॥ १ ॥ वृथा कर्म तेवीं मृत्युलोकीं गोवी। लांव मोहे बरवी काय बाळा ॥ २ ॥ ऐसें ही जाणता धरी जो ममता। ज्ञानी ह्मणताना हांसूं येतें ॥ ३ ॥ राक्षसी आसुरी मूढा प्रकृती खरी। आश्रित भिकारी तुका वंची ॥ ४ ॥

॥ ७५८७ ॥ महा सुबुद्धि तो पार्था मी सांगतों। नांव घेतां येतो डोळूस गा ॥ १ ॥ दैवी प्रकृतीनें आदरी मत्पूजनें। जैसी पद्मवनें मानसांत ॥ २ ॥

परी ते गा भक्ती अद्वैतींच प्रीति । कीं मी आदि अंतीं जाणूनीयां ॥ ३ ॥ एकापासी भाव दुजा तेथें वाव । पतिव्रता नांव तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७५८८ ॥ माझी कथा वार्त्ता ऐके द्रवचित्ता । नित्य रत ममता माझी ऐसी ॥ १ ॥ जेणें देवजोडे त्या यत्नीं वावडे । अभंग पवाडे दृढव्रत ॥ २ ॥ वंदिती भक्तीनें निजात्मप्रीतीनें । स्वरूप रीतीनें नित्यमुक्त ॥ ३ ॥ जगा ययापरी त्याच्या द्वारीं करीं ॥ काठी धरू हारी ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७५८९ ॥ वृत्ति हो मीच कीं भावन ते एकी । सती पैं पावकीं माया त्यागें ॥ १ ॥ किंवा मजवाटे ध्यातो तो गोमटें । कर्म हव्य वाटे विश्वतोमुख ॥ २ ॥ एकत्वेंच ऐसा विश्वरूपीं पीसा । एकची जिज्ञासा परि गमे ॥ ३ ॥ बहुधा असती देवा ये जगतीं । याजक ह्मणती तुकाराम ॥ ४ ॥

॥ ७५९० ॥ विश्वतोमुख पूर्ण त्याची हे गा खूण । बुझे अंतःकरण ऐसाच कीं ॥ १ ॥ मुख यज्ञ पुरे पितृ व्रत सारें । मीच मी द्रव्यरे मंत्रआज्य ॥ २ ॥ तेथें मुख्य अग्नी तो मी ऐके कानीं । हुतही निदानीं मीच होम ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं आत्म्यावीण कांहीं । सांगे वर्म पाही गुरू शिष्या ॥ ४ ॥

॥ ७५९१ ॥ बाप मी माय मी जग धरणार मी । ज्ञेय तें शुद्ध मी जाणीवगा ॥ १ ॥ अकार उकार तीसरा मकार । अर्ध मात्रावर ओंकार मी ॥ २ ॥ ऋग्वेद मी यजुर्वेद महाराजु । सामवेद तेजु गायन मी ॥ ३ ॥ गती पाळक मी साक्षी आगमनिगमीं । तुका ह्मणे स्वामी पुढें बोले ॥ ४ ॥

॥ ७५९२ ॥ वासस्थान पार्था मीच पैं सर्वथा । नव्हेच अन्यथा वचन हें ॥ १ ॥ शरणागता मान्य सखा मी सौजन्य । इच्छिती जघन्य पडेचिना ॥ २ ॥ मी सृष्टि उत्पत्ति वाढे माझ्या हातीं । मोडे सहज रीतीं क्रोधाचीये ॥ ३ ॥ विधि मी बीज मी सतत नित्य मी । तुका ह्मणे स्वामी काय बोले ॥ ४ ॥

॥ ७५९३ ॥ तपतों तो ताप वर्षतों ते वृष्टी । ओढितों मी सृष्टी सोडीतों मी ॥ १ ॥ मोक्ष मी पांडवा मरण माझेनीच । जडही गा साच मजसाठीं ॥ २ ॥ चैतन्य चंचळ निश्चळ माझेनी । अर्जुना तूं मानी गोष्टि खरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाग्य आधिला हा पार्थ । देव पूर्ण अर्थ सांगे जया ॥ ४ ॥

॥ ७५९४ ॥ इंद्रादिक रूपें यजूनी बहुधा । केला पुण्य बांधा अक्षयत्वें ॥ १ ॥ मातेंच पैं वेदीं तीहीं सोमपानीं । मग ते निदानीं घेती सुखा ॥ २ ॥

इंद्रासनारूढ होती अमर दृढ । घेती सुरवाड उर्वशीचा ॥ ३ ॥ दिविचर फेरे घेती विमानांत । तुका ह्मणे भूत भविष्य केलें ॥ ४ ॥

॥ ७५९५ ॥ ऐसे भोग भोगी जंववरी सुकृत । सरल्या पतीत तोची होय ॥ १ ॥ हाक फोडी धर्मदूत महा गजरें । तळीं या लोटारे उन्मत्तासी ॥ २ ॥ पडे दंड शिरीं तेव्हां अंतराळीं । विमान डळमळी अधोमुख ॥ ३ ॥ तेजें भरे नभ पाहाती भूलोक । ह्मणती पुण्यश्लोक ढांसळला ॥ ४ ॥ कौतुक करीती नेणती आपुलें । पाप जें कां केलें छळीतसे ॥ ५ ॥ असो हे निपुण वैदिकांचीं कर्मे । निरूपीतों कर्मे गतागती ॥ ६ ॥ पावती सखया ऐसे कामकामी । तुका ह्मणे आह्मी बरे असों ॥ ७ ॥

॥ ७५९६ ॥ अन्य सांगें मातें भजे गर्भवंत । व्यापारा नेणत एकध्यानें ॥ १ ॥ चिंतींती भजती जन जे पार्थिवा । अभियुक्त सेवा नित्यमार्गीं ॥ २ ॥ त्याचा योगक्षेम राहे आनंदांत । वाहतों मनांत चिंता ऐसी ॥ ३ ॥ मज चिंता नाहीं आपले तनूचि । काळजी भक्तांची ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७५९७ ॥ येरवी कौंतिया अन्यत्र ही देवा । भावें करी सेवा कोणी प्राणी ॥ १ ॥ अन्य भक्ति भजे अन्य उपासनें । येती भरंवसेने अमुच्या घरीं ॥ २ ॥ परंतु अविधीपूर्वक संचय । जेणें योगें क्षय सर्वस्वाचा ॥ ३ ॥ तैसें नको वीरा स्पष्ट मी सांगतों । गुंती न करी तूं तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७५९८ ॥ मीच स्वामी भोक्ता प्रभू आहूतीचा । आणीक मंत्रांचा असो कोणी ॥ १ ॥ अग्नी मम मुखें गोकुळीं गीळिला । यज्ञ द्रव्य त्याला उत्पत्ती मी ॥ २ ॥ कीं मातें नेणती पाहती तत्वझाडा । तेथें तो उघडा ईश मीच ॥ ३ ॥ उपाधिक बीज तें ही मी अर्जुना । ठावकें सज्जना तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७५९९ ॥ भजनाचीं फळें असती बहुत । आह्मी सांगों त्यांत मुख्य चार ॥ १ ॥ देवतोपासनी देवांस पावतो । पदवी भोगितो ऐश्वर्याची ॥ २ ॥ पितरा उद्देशें श्राद्ध पक्ष दर्श । तेणें ध्यात्ये हर्ष पितृलोकीं ॥ ३ ॥ भूतांचें यजन साधन श्मशानीं । अंतीं तेंच स्थानीं अधिकारी ॥ ४ ॥ आतां माझी भक्ती मातेंच पावेल । आनंदें गायील तुका जैसा ॥ ५ ॥

॥ ७६०० ॥ संकट तें नाहीं वैष्णवा पूजेचें । स्वल्प हतत्रटीचें वर्म सांगुं ॥ १ ॥ पत्र हो वृक्षाचें तुलसीचें बेलाचें । फलही फुकाचें सांपडे जें ॥ २ ॥ वनफळ भिल्लटीचें परी असो । चवी न नवसो जयामाजी ॥ ३ ॥

नातरी पाण्याचें संकट पडेना । होतों मी हीवेंना भक्तीतापें ॥ ४ ॥ भक्षी पसरूनी मुख लाडें कोंडें । निष्काम आवडे ह्मणें तुका ॥ ५ ॥

॥ ७६०१ ॥ तुं ह्मणसी आह्मी भक्ति कैसी कीजे । श्लोकार्थ सांगीजे याच लागीं ॥ १ ॥ करिसी कर्म हातें मुखें जें भक्षीसी । अथवा दानें देसी याचकाला ॥ २ ॥ होमिसी यद्यपि राजसुहयमेधीं । नेमें तप कधीं आचरसी ॥ ३ ॥ पार्था जें तें करी मदर्पण सर्व । एक गेल्या गर्व तुका होतो ॥ ४ ॥

॥ ७६०२ ॥ घेउनी सुकृत ह्मणसी देसी काय । गोष्टी सुख माय तेच ऐक ॥ १ ॥ फला बऱ्या वाईटाचा तूं विभागी । पासोनियां उगी वृत्ती मुक्त ॥ २ ॥ असा या संन्यासें युक्तचि ते त्वरा । पावसी सत्वरा मज मुक्त ॥ ३ ॥ तुका दास गुरु किंकर पावन । झाला तेणें जन उद्धरीलें ॥ ४ ॥

॥ ७६०३ ॥ भूताकृती भिन्न छंद यांचे भिन्न । साधू सर्वा भिन्न एक मोहो ॥ १ ॥ द्वेषु ना उमटे जे प्रीय तें तैसें । धरत्रींचे असे शीळ जेवीं ॥ २ ॥ वडील धाकुटा सद्गुरु न जाणे । ऐसी ममता जेणें साधीजेगा ॥ ३ ॥ माझे ठायीं तोची साचे ठायीं मीची । दर्पण बिंबाची तुका कळा ॥ ४ ॥

॥ ७६०४ ॥ जरी असे दुराचारी । वाल्हा कोळी याचेसरी ॥ १ ॥ भजे मज न आणिका । शैव जैसा कीं त्र्यंबका ॥ २ ॥ तो तो साधुच मानावा । जेथें देव सांपडावा ॥ ३ ॥ तेथें निश्चयचि देव । तुकया नेणे हव्य-कव्य ॥ ४ ॥

॥ ७६०५ ॥ तोगा होतो शीघ्रगती । धर्मात्मा हे जाण स्थिती ॥ १ ॥ शांती शाश्वत पावतो । कीं मारुती मज भासतो ॥ २ ॥ पार्था नासेना मद्भक्त । ध्रुव तेंवी राहे स्वस्थ ॥ ३ ॥ पैज घाली तूं हे जगीं ॥ तुका लीन पांडुरंगीं ॥ ४ ॥

॥ ७६०६ ॥ चांडाळादिक जातीनें । आश्रय द्यावा संगतीनें ॥ १ ॥ पापी तेही महा गतीनें । येथें गर्जती पुराणें ॥ २ ॥ मातें पावती भजतां । येथें नोहे द्वैत वार्त्ता ॥ ३ ॥ स्त्रिया वैश्य शूद्र ही । तुका ह्मणे पार नाहीं ॥ ४ ॥

॥ ७६०७ ॥ पुण्य ब्राह्मण राजर्षि । गाधि जामदग्न्य ऋषी ॥ १ ॥ त्याचें कायसें नवल । आहे मोक्ष चवरडोल ॥ २ ॥ अनित्य दुःख मृत्यु-लोकीं । फळ हेंच गा अवलोकीं ॥ ३ ॥ मातें पार्थिवा भजावें । तुकया ऐसें उद्धरावें ॥ ४ ॥

॥ ७६०८ ॥ आर्ता प्रसंगांतीं गोष्ट । तुसीं एक बोलूं स्पष्ट ॥ १ ॥ मन ज्याचें माझ्या रूपीं । भक्ति माझ्या जैशा गोपी ॥ २ ॥ माझें यजन वंदन । राधा प्रिय नंदसून ॥ ३ ॥ मद्राश्रित चित्त असे । मज पावे तुका कैसें ॥४॥

॥ ७६०९ ॥ ऐसा मद्याजीचा अर्थ । नवमीं ऐकें भला पार्थ ॥ १ ॥ प्रसंग संपला येथुनी । भाव जाणावा सज्जनीं ॥ २ ॥ राजविद्या राजगुह्य । योग वर्णिलासे पाहे ॥ ३ ॥ श्रवण पठणें संशय । तुका ह्मणे लया जाय ॥ ४ ॥

---

## अध्याय दहावा.

---

॥ ७६१० ॥ अहो ऐका विद्वज्जना । संत चतुर सज्जना ॥ १ ॥ माझी दुर्बळाची मती । मान करा ठेउनि प्रीतीं ॥ २ ॥ जेणें रंजे तुमचें चित्त । नसे साहित्याचा हात ॥ ३ ॥ बहु पंडितां पुढारी । लाजे आर्षिका वैखरी ॥ ४ ॥ आतां लागले जे कासे । नये सांडूं त्या प्रकाशें ॥ ५ ॥ बाळ मित्र रंक गोष्टी । देवें ऐकिल्या गोमटी ॥ ६ ॥ येथें वाटे शालजोडी । तेथें केतुली घोंगडी ॥ ७ ॥ तुमचें करणें कापूराचें । माझें तेणें कापूसाचें ॥ ८ ॥ जेथें खवळले रणशूर । त्यांत गारयाचा बडिवार ॥ ९ ॥ परी ईश्वरा करितां । मज सांपडली गीता ॥ १० ॥ तिच्या संगें अंगीकार । केला तरी द्यावा थार ॥ ११ ॥ आतां देवाचाही देव । बोलें दशमी वासुदेव ॥ १२ ॥ कीं किरिटी पुना ऐक । बोल माझा हा रसीक ॥ १३ ॥ तुझ्या हितालागीं वदें । नाना मीसें अंतरिं नांदे ॥ १४ ॥ हितज्ञयाचें जाणोव । प्रीती मानिसी स्वभाव ॥ १५ ॥ तुका ह्मणे भवार्थिया । देव बोलला कौंतेया ॥ १६ ॥

॥ ७६११ ॥ पार्था देव इंद्रादिक । अथवा ऋषींचे नायक ॥ १ ॥ आमचा प्रादुर्भाव यातें । न समजला निगममतें ॥ २ ॥ कीं मी देवा महर्षींचा । आदिकारण सर्वांचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बीजास्तव । झाला तरु नेणें देव ॥ ४ ॥

॥ ७६१२ ॥ सुज्ञ त्यास आह्मीं ह्मणूं । माझें माहात्म्य लागे वर्णूं ॥ १ ॥ अज अनादित्वें ईश । मुख्य सर्वां जो सर्वेश ॥ २ ॥ मनुष्यांत बंधांतुनी । तो सुटला तूं हें मानी ॥ ३ ॥ तोंड देखलीच गोष्ट । नव्हे तुकया नेदु कष्ट ॥ ४ ॥

॥ ७६१३ ॥ आतां सत्पुरुष कैसा । जगीं मान्य सांगूं तैसा ॥१॥ बुद्धि ज्ञान क्षमा सत्य । निज शांतीची आगत्य ॥ २ ॥ करी इंद्रियनिग्रहो । चंद्र कळे ग्रासुनि राहो ॥ ३ ॥ मोहनाश सुख दुःखें । जन्ममृत्यु भयें हरिखें ॥४॥ तुका करीतो वीनंती । कृष्ण सांगे कमळापती ॥ ५ ॥

॥ ७६१४ ॥ तप दान दया साम्य । तुष्टी कीर्ती अकीर्ति गम्य ॥१॥ होती मजची पासूनी । ऋतु जैसे नभस्थानीं ॥ २ ॥ भूतांचे ही पृथक् भाव । लहरी प्रती सिंधुठाव ॥ ३ ॥ तैसें खेळणें ययाचें । अंतीं आमुच्या तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ७६१५ ॥ कौशिक भारद्वाजादिक । सप्तऋषी वेकर्णिक ॥ चौघे मनु मिळुनी एक । अकरा झाले संख्येनें ॥ १ ॥ सनक सनंदन थोर । बुध सूर्य सनत्कुमार ॥ मानस पुत्र हे साचार । पै धाताचे वोळखे ॥ २ ॥ पूर्वी झाले हेम ऋत । साग सर्वांचा विरक्त ॥ परी पाहतां जांची शक्त । प्रजा ज्यांच्या लोकीं या ॥ ३ ॥ तुका ह्मणे आणिक एक । श्लोक ब्रह्मांडनायक ॥ बोलेल तो पुण्यश्लोक । सावधान ऐकिजे ॥ ४ ॥

॥ ७६१६ ॥ एवं विभूति योगांस । कीं मी आत्मा यां सर्वांस ॥ व्यापुनि वेगळ्यापणास । जो जाणेल जाणता ॥ १ ॥ तोच कोणे एके वेळें । येउनियां स्वरूपीं मिळे ॥ हें ही नको हृदयशाळे । टाक मुद्रा तयाची ॥ २ ॥ ह्मणउनी अचला अन्ययें । माते योजुनी संशय ॥ तुकयाची कृपा होय । तो शुक ऐसा अनुभवी ॥ ३ ॥

॥ ७६१७ ॥ नाहीं मजवीण कांहीं । उदका वीण रस नाहीं ॥ बरे विचारुनियां पाहीं । मी उद्भव सर्वांचा ॥ १ ॥ मजपासुनी सर्वही । भार भूताचळा मही ॥ शेष केला कूर्म तोही । आहे वराह आधारें ॥ २ ॥ त्यास ही धर्म मूळलिंग । स्तंभ त्याचा आहे संग ॥ पुढें न सुचे जग । ह्मणती आधार अच्युत ॥ ३ ॥ ऐसे जाणोनि भजती । अभिज्ञाची अति प्रीति ॥ तुका विनवीतां चित्तीं । संशय उडे परिवारें ॥ ४ ॥

॥ ७६१८ ॥ सर्व साधनाच्या कळा । प्राणाचित्त हे चपळा ॥ स्थिरावल्या एक पळा । मग उणें तें काय ॥ १ ॥ यास माझा बोध दावी । वळे तरी युक्त बरवी ॥ ना तरी आस्था सोडावी । सुखें ध्यावी मन्नामें ॥ २ ॥ मग मी काळची काळाचा ॥ ग्रास करीन खळांचा ॥ परी आत्मिक स्थळाचा । नेदी पडों अंतर ॥ ३ ॥ मग वर्णिती सर्वदा । गाती मन्नामसंपदा ॥ कोणी नाचे संवादा । ऐकोनी तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ७६१९ ॥ तयां ऐसा सदा युक्त । जेवीं कौरवीं देवव्रत ॥ अपंचीं असोनी विरक्त । श्रेष्ठ माथा वंदिती ॥ १ ॥ प्रीतीपूर्वक भजनासी । केल्या ह्मणसी काय देसी ॥ तरी बुद्धि योगा कैसी । वृद्धि करितों हें नवल । ॥ २ ॥ मज जेणें कां पावती । ऐसी अचळ करितो मती ॥ तुका या अंगीं प्रळय गती । लागेनाच सर्वथा ॥ ३ ॥

॥ ७६२० ॥ योग कृपेचा खडतर । नासत तमाचा अंधार ॥ ज्ञान दिवा शुद्ध आकार । सुखें हातीं वागवी ॥ १ ॥ जें अज्ञान जडद्वाड । भ्रांति लावीतें कवाड ॥ मग न दिसे महा गाढ । मध्यरात्रीं अमावासी ॥ २ ॥ मग ज्ञानार्क झळकतां । तमा पळवी दिगंता ॥ तैं गा सौख्याचा मागता । तुका झाला होता कीं ॥ ३ ॥

॥ ७६२१ ॥ अर्जुन बोले विनयें भावें । कांहीं वाक्य आईकावें ॥ एक अपराध स्वभावें । आमुचा आह्मा वाटतो ॥ १ ॥ तोचि बोलूं न दाखवूं । राखो कायसा आपाड ॥ जेणें घेतलासे जीवु । तो काळज्वर टाळावा ॥ २ ॥ परब्रह्म अधिष्ठान । तुझें अत्यंत पावन । आत्मा शाश्वत निधान । आलें येथें कळोनी ॥ ३ ॥ आदि देहीं दिव्य मूर्ति । अज प्रभुवरा कीर्ती ॥ मातें समजली धृती । तुकया वेश्या सारखी ॥ ४ ॥

॥ ७६२२ ॥ या रितीं ह्मणती तुतें । घेउनी श्रुतीचीं संमतें ॥ ऋषी राजर्षि सहितें । नारदादि देवऋषी ॥ १ ॥ देवल व्यास असित । स्वयें येउनी सांगत ॥ उमजलें जया हीत । संजया ऐसें आमुचें ॥ २ ॥ परी काळसर्प डसे । तनू व्यापिली सारांशें ॥ नये समज उद्देशें । आतां तुका गाहिंवरे ॥ ३ ॥

॥ ७६२३ ॥ हें अजीच वाटे सत्य । पहिली ना धरूं अगत्य ॥ गाणें ऐको उपांगीत । नादीं जीव ठेउनी ॥ १ ॥ तुझावरी भाव कैसा । जीवलगू सुह्रद जैसा ॥ आज उमटला ठसा । परब्रह्मा तव मुखें ॥ २ ॥ हे भगवन् तुझी व्यक्ती । दैत्य दानव नेणती ॥ तेथें आमुचा पाड कीती । तुका तरी मनुष्य ॥ ३ ॥

॥ ७६२४ ॥ स्व प्रकाशाचें रूप । अंगें होसी स्वयंरूप ॥ सर्व जाणत्यांचा भूप । पुरुषोत्तम पुरुषीं ॥ १ ॥ भूतपाळक भूतेशा । देवदेव जगपतेशा ॥ आमुची पुरविजे आशा । हेच इच्छा तव मनीं ॥ २ ॥ वसुदेवादिस्तव । निवटिला दैत्यराव ॥ मज वाटे वासुदेव । झाला मज करितां

॥ ३ ॥ मोहवंदीं पडिलों होतों । तव कृपें मुक्त झालों तो ॥ तुका वरदें तरला तो । गुरुदास हें वाणूं ॥ ४ ॥

॥ ७६२५ ॥ तुझ्या विभूती ज्या दिव्य ह्मणताती । पांगली सकीर्तीं महीपृष्ठीं ॥ १ ॥ अशेष आद्यवी मातें निरूपावी । यश तूं गोसांवी संपादीहें ॥ २ ॥ विभूतीनें लोक व्यापूनी हे देख । असतोसी व्यापक सदोदित ॥ ३ ॥ तुकया आनंद सांगतां संवाद । कीं माशीवरद तो ही सुखी ॥ ४ ॥

॥ ७६२६ ॥ कैसें योगेश्वरा तुतें या अंतरा । चिंतूनी संसारा मुक्त होणें ॥ १ ॥ सदा मी चिंतीतों तुज ठावा आहे तो । आहेसी सांग तूं कोण्या रूपें ॥ २ ॥ योग्य या चिंतनीं जेणें मोक्ष दानीं । तें स्थूल ध्यानीं प्रगटी देवा ॥ ३ ॥ शेषासी न कळे तुकी अगम्य लीळें । अंथरूणीं वळे याच लाजा ॥ ४ ॥

॥ ७६२७ ॥ विस्तारें आपुला योग हा संचिला ॥ ह्मणसी नाहीं दिला कोणापुढें ॥ १ ॥ परी मी अनन्य जाणुनी अमान्य । केल्या हें जघन्य बाधी तुज ॥ २ ॥ जनार्दना विभुती वदाव्या मागुती । कांजे नव्हे तृप्ती श्रवणामृतें ॥ ३ ॥ अमृत अमर करी गणती वर । तुझी अगोचर कृपासुधा ॥ ४ ॥ आतां अर्जुनाची आशंका जीवींची । फेडीती कृष्णाची पूर्ण दया ॥ ५ ॥ तोची शब्द ऐका सावध करी तुका । व्यापार लटीका सोडा ह्मणे ॥ ६ ॥

॥ ७६२८ ॥ हर्षे कृष्ण ह्मणे दिव्या ह्या जाणणें । विभूती स्वमनें प्रकाशीतों ॥ १ ॥ तुतें या आपुल्या ऐशा सांगीतल्या । होतील ऐकील्या नाहीं ऐशा ॥ २ ॥ प्रत्यक्ष पाहासी साक्षात्कार घेसी । परी नसे त्यांसी आदी अंत ॥ ३ ॥ सांगेन मुख्यत्वें परिसे निजसत्वें । तुकया धन्यत्वें नांवाजूनी ॥ ४ ॥

॥ ७६२९ ॥ विभूती मुख्य मी आत्मा नर स्वामी । नीळी माते व्योमीं व्यापे जैसी ॥ १ ॥ सर्वांच्या आशयीं स्फुरे सर्वां ठायीं । रिक्तपण नाहीं अणुभर ॥ २ ॥ आदि जो जडांच्या मध्यांत युक्तीच्या । वैष्णव शक्तीच्या आधारें ह्या ॥ ३ ॥ घटाला मृत्तिका जेवीं व्यापी ऐका । तैसा आत्मा तुका एकवीध ॥ ४ ॥

॥ ७६३० ॥ अदिती आदित्य प्रसवली सत्र । बारावा सांप्रत अहं विष्णु ॥ १ ॥ दृश्य ज्योती यांत सूर्य मी साक्षात । तरी प्रकाशीत पृथ्वी पटा ॥ २ ॥ मरीची मरुत चंद्र ताराकांत । औषधीं पोशीत रश्मिस्पर्शें ॥ ॥ ३ ॥ क्षय कलंकानी गेला जरी व्यापुनी । सदाशीव मुर्ध्नीं विराजला ॥ ४ ॥

॥ ७६३१ ॥ सर्वां वेदांमाजी सामवेद आजी । प्रगटला तेजीं माझ्या रूपीं ॥ १ ॥ इंद्र जो देवां ।। व्यापार भुवनांचा । शास्ता दानवांचा वज्री तो मी ॥ २ ॥ मीषें इंद्रिय यामीं वावरे मन स्वामी । अनिवार नामीं अंशें माझ्या ॥ ३ ॥ आतां भूताकृती यामाजी प्रतीती । बोले गोपीपती तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७६३२ ॥ रुद्रांत शंकर यक्षांत कुबेर । वसुमध्यें थोर पावक मी ॥ ॥ १ ॥ शिखरिमाजी मेरू बोले जगद्गुरू । आहे ज्याचा भारू पृथ्वी मानीं ॥ २ ॥ उतरें उत्तरे सुर भार न ठरे । दक्षिण हि धारे क्षेत्रासह ॥ ३ ॥ मग आगस्तिसी स्थापिलें वेगेसी । तुकया धरेसी धीर झाला ॥ ४ ॥

॥ ७६३३ ॥ पुरुहूतीं श्रेष्ठ पुरोहित वरिष्ठ । देव गुरु ज्येष्ठ अंश माझा ॥ १ ॥ तरी तेतीस कोटी घालूनि पदिं मोठी । नीजहीत गोष्टी विचारीती ॥ २ ॥ आतां पार्थ स्वामी कार्तिक अग्रयमी । सेनापतींत मी ह्मणवीतों ॥ ३ ॥ सरोवरीं सिंधु ह्मणवी दीनबंधु । जेणें दीला वेधु तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७६३४ ॥ महर्षींत भृगू देव ह्मणे सांगू । ज्याच्या क्रोधीं वागू शांतिरूपें ॥ १ ॥ वाणींत प्रणव अक्षर स्वभाव । बोले वासुदेव ऐक्य रूपें ॥ २ ॥ यज्ञीं जप यज्ञ जाण मी सुयज्ञ । पावती अभिज्ञ वांछित मी ॥ ३ ॥ अचळीं हिमालय मीच स्वयें होय । तुकयासी ठाय सांपडला ॥ ४ ॥

॥ ७६३५ ॥ सर्व ही वृक्षांत राया पिंपळ थोर । माझाच आकार मूर्तिमय ॥ १ ॥ देवर्षींत मीच झालों गा नारद । कीर्तनाचा छंद वाढावया ॥ २ ॥ कलह लाऊनी पाहातों कौतुक । क्रोध त्रिपुरांतक ज्याचा नये ॥ ३ ॥ देवदैत्यां सम मान्य गुरु जैसा । कंस कृष्ण तैसा राखों जाणे ॥ ४ ॥ आतां चित्ररथ मीच गंधर्वांत । कपिल सिद्धांत तुका आला ॥ ५ ॥

॥ ७६३६ ॥ उच्चैःश्रवा अश्वीं झाला क्षीराब्धींत । गजीं ऐरावत मीच होय ॥ १ ॥ नरांत भूपाळ मी होय अर्जुना । अकर्म शासना नैय्यायिकीं ॥ २ ॥ राजनिंदा केली तें मातें लागतें । मच्छाप बाधा ते प्राणी पावे

॥ ३ ॥ तुका ह्मणे राज्य आह्मा त्रिभुवनींचें । सहज निंदकाचें तोंड काळें ॥ ४ ॥

॥ ७६३७ ॥ आयुधीं मी वज्र करीं गिरी चूर । तेजें ज्या थरार धरा कांपे ॥ १ ॥ अंगवात धाके शेष जिव्हा काढी । चंद्र दैत्यमठीं जीता होय ॥ २ ॥ एवढा प्रताप दधीची ऋषीचा । त्याचीया हाडांचा दंभो लिहा ॥ ३ ॥ धेनु कामधेनू संतानांत काम । सर्पी तुका नाम वासूकीतो ॥ ४ ॥

॥ ७६३८ ॥ जळजंतुमाजी ह्मणवीलों वरुण । शेष मी आपण नागजातीं ॥ १ ॥ ह्मणूनी अवतारीं रक्षितों पाठीसीं । मजहूनि गुणेसीं आगळा जो ॥ २ ॥ पितृगणांमाजी अर्यमा ह्मणवितों । भाग सर्व देतों पितरांसी ॥ ३ ॥ निग्रहकर्त्यांत यम ह्मणवीतों । ज्यासी लोक भीतो तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७६३९ ॥ दैत्यांत प्र्ल्हाद मीच रक्षपाळ । चाळणारा काळ मीच झालों ॥ १ ॥ श्वापदांत सिंह तैसाच खगेंद्र । पक्ष्यांत पक्षींद्र रूप माझें ॥ २ ॥ शेषाही अधीक भक्ती गरुडाची । तैसीच आमची तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७६४० ॥ उडती सांत वायू शस्त्र पाणियांत । जानकीचा कांत राम तो मी ॥ १ ॥ मत्स्यांत मगर नद्यांत जान्हवी । रूपें वोळखावीं माझ्याठायीं ॥ २ ॥ तरीच मस्तकीं घेऊनी स्वर्धुनी । शिव आनंदवनीं विराजला ॥ ३ ॥ कलियुगीं नाम तारक हरीचें । तैसें भागीरथीचे जीवन तुका ॥ ४ ॥

॥ ७६४१ ॥ आद्यंत तयां तत्त्व सृष्टीचा पांडवा । मध्य ही मी तेव्हां प्रकाशांत ॥ १ ॥ ऐसें जाणे खुणें विद्यातें अध्यात्म । ह्मणावे पुरुषोत्तम विद्येमाजी ॥ २ ॥ तत्त्ववेत्त्यांमाजी तत्व ह्मणवीतों । ज्यामाजी विरतो तुका स्वयें ॥ ३ ॥

॥ ७६४२ ॥ अक्षरीं अकार मीच धनंजया । समासीं सखया द्वंद्वनामी ॥ १ ॥ नित्य जो कां काळ मी स्वयें गोपाळ । आधार सबळ सर्वांचा मी ॥ २ ॥ सर्वों सर्व मूर्खी तृप्त अन्नदाता । जीवा वांचवीता मीच तुका ॥ ३ ॥

॥ ७६४३ ॥ मरण मी जीवां संहर्ता जयांची । जेथें जाणीवेची कळा लोपे ॥ १ ॥ जन्म मी ह्मणूनी होतों पुत्रोत्सव । रंक हो कां राव सुखसम ॥ २ ॥ नारींत स्त्रीलिंगीं कीर्ति जे श्रीवाणी । जेणें गुणें प्राणी महत्वा ये ॥ ३ ॥ स्मृति प्रज्ञा धृती क्षमा तुकारामीं । पावला आरामीं निरंतर ॥ ४ ॥

॥ ७६४४ ॥ सामवेदीं जाण बृहत्साम सूत्र । विचाराचें पात्र तेंही मीच ॥ १ ॥ छंदींगायत्री जे नाम मी पांडवा । मासांत जाणावा मार्गशीर्ष ॥ २ ॥ ऋतूंत वसंत वर्णी ज्यासी व्यास । तुका ह्मणे त्रास कळीकाळा ॥ ३ ॥

॥ ७६४५ ॥ कपट्यांमाजी द्यूत तें मीच साक्षात । चोरी बाजारांत न वारवे ॥ १ ॥ तेजस्वी पुरुषांत तेज तें माझेंची । कां जे समर्थांची सत्ता नाहीं ॥ २ ॥ आतां जयो तेवीं निश्चय ही मीच । दिवसंदिवस उंच कळा चढे ॥ ३ ॥ सत्ववंतीं सत्व माझेंच पांडवा । जगांनीं जाचावा स्वस्थ तुका ॥ ४ ॥

॥ ७६४६ ॥ वृष्णिवंशीं वासुदेव । तो मी ह्मणे देवराव ॥ १ ॥ ज्याचे अचाट पवाडे । वर्णनीं शुक व्यास वेडे ॥ २ ॥ विधिशक्रां अगोचर । नंदगोष्ठांगणीं ईश्वर ॥ ३ ॥ असो पांच पांडवांत । धनंजय तूं साक्षात ॥ ४ ॥ तापसवेषें बहिण नेली । आमुची मर्जी न पां कळली ॥ ५ ॥ कां जे दोघांचें एकत्व । मुनींत व्यास तेवीं तत्व ॥ ६ ॥ कविमाजी शुक जो कां । तोही मीच मानी तुका ॥ ७ ॥

॥ ७६४७ ॥ दंडकर्तांमध्यें दंड । तो मी ह्मणोनी प्रचंड ॥ १ ॥ जीकीं न्याय मार्गीं नीती । तेही मच्छक्ती नीरुती ॥ २ ॥ परेचें जें गुह्य मौन । मीच न जाणे ईशान ॥ ३ ॥ आतां ज्ञान जें ज्ञानीयां । ज्ञानेश्वरु वंद्य ठायां ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे रीतीं । सांगूनियां भगवंतीं ॥ ५ ॥

॥ ७६४८ ॥ जें निस सर्वही भूतां । बीज ते मी पांडुसुता ॥ १ ॥ न घडे कीं मजवीण । चराचरांचें कारण ॥ २ ॥ मातें मूढ न वोळखे । पैं मी सर्वांसी पारिखे ॥ ३ ॥ तुकी उतरे आमुचें । एक मानस तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ७६४९ ॥ झाल्या मजचीपासूनी । दिव्य ह्मणो त्या लागूनी ॥ १ ॥ माझ्या विभूतींचा अंत । परंतपा जाणे मात ॥ २ ॥ हा तो विभूतीविस्तार । पाहों न शके दिनकर ॥ ३ ॥ म्यां वर्णिला संक्षेपें । ऐक तुकया आक्षेपें ॥ ४ ॥

॥ ७६५० ॥ आतां जे कां भाग्यवंत । प्राणी होत श्रीमंत ॥ १ ॥ ठसा दैवाचा प्रगटे । सुख सिंधुचि विर्भी दाटे ॥ २ ॥ तो तो प्राणी कीर्तीमान जाणे मीच भगवान ॥ ३ ॥ आहे तेजोंशसंभव । तरी तुकयाचा भाव ॥ ४ ॥

॥ ७६५१ ॥ आतां बहुतां या ज्ञानें । फांटा भरिजेल मनें ॥ १ ॥ किती अर्जुना जाणसी । श्रम नदी उतरसी ॥ २ ॥ जें कां उतरलें अधिष्ठुनी । एक अंशें हें जगमानी ॥ ३ ॥ तुका वदला किंचित । झाला विस्तार बहुत ॥ ४ ॥

॥ ७६५२ ॥ झाला प्रसंग समाप्त । कृष्ण अर्जुना संमत ॥ १ ॥ योग शास्त्र खरें दिसे । माया भंजन शस्त्र असे ॥ २ ॥ येथें विभूती वर्णिल्या । अर्जुना अंगीं विस्तारल्या ॥ ३ ॥ आतां पुढें चमत्कारें । तुका बोलेल आदरें ॥ ४ ॥

## अध्याय अकरावा.

॥ ७६५३ ॥ नवमाध्यायीं बोलिला । पश्यमे योगमैश्वरबोला ॥ १ ॥ कीं पाहेरे मम ईशाची । विश्व निर्माण युक्तीचि ॥ २ ॥ मजमाजी विश्व नसे । विश्वामाजी मी ना दिसें ॥ ३ ॥ विश्वपट ब्रह्मदोरा । ह्याहि जाणावी विचारा ॥ ४ ॥ येथें संशयो वाटला । विश्वरूपा न भेटला ॥ ५ ॥ तरी हा होय कल्पतरू । मागतांच देईल वरू ॥ ६ ॥ मग काळजी ते वायां । ऐसा निश्चय करूनीयां ॥ ७ ॥ पुढें एका मागें एक । श्लोक विभूती कौतुक ॥ ॥ ८ ॥ ऐकतांना पैं शेवटीं । अपूर्वता कृष्ण गोठी ॥ ९ ॥ एकांशेन स्थितो जगत । पार्थ झाला आशंकित ॥ १० ॥ तेंच प्रत्यक्ष पाहावें । एकादृशु तेणें भावें ॥ ११ ॥ तुका एकदेशें आला । एकदेशीं वावो झाला ॥ १२ ॥

॥ ७६५४ ॥ घालुनियां लोटांगण । करी आपण विनंती ॥ १ ॥ माझ्या अनुग्रहास्तव । वासुदेव कृपाळु ॥ २ ॥ केवळ गुह्य जें अध्यात्म । ऋषी उत्तम नेणती ॥ ३ ॥ तुवां बोधिलें तेंणेंची । व्यामोहाची बोळवण ॥ ॥ ४ ॥ झालों पूर्ण परी एका । शब्दीं तुका बुझतो ॥ ५ ॥

॥ ७६५५ ॥ सृष्टी संहार भूतांचे । निश्चय साचें तुजपून ॥ १ ॥ तुजपासूनी विस्तार । चराचर आघवें ॥ २ ॥ पद्मदळाक्षा माहात्म्य । मनोरम हें तुझें ॥ ३ ॥ दिव्य ऐकिलें तुकयानें । भरंवशानें सुटला ॥

॥ ७६५६ ॥ आपणातें हें बोलसी । आशंकेसी परिहारू ॥ १ ॥ परमेश्वरा गा ऐसेंची । करी कृपेची सुदृष्टि ॥ २ ॥ विश्वरूप तुझें पाहों । तेणेंचि हों निःशंक ॥ ३ ॥ इच्छितों मी पुरुषोत्तमा । जिका क्षमा तुकयाची ॥ ४ ॥